# धर्मसंस्कार

आपल्या पूर्वजांनी आपणास सांस्कृतिक तसेच सामाजिक बनविण्याकरीता आपल्या अथक प्रयत्न आणि संशोधनाच्या जोरावर हे धर्मसंस्कार तयार केले आहेत. याच संस्कारांमुळे भारतीय संस्कृति अद्वितीय आहे. परंतु अलिकडील काही वर्षात व्यस्त जीवन मान, धावपळीमुळे लोक या मूल्यास हळूहळू विसरू लागलेत. यांचा परीणाम त्याच्या चारीत्र्य, असामाजिकता, अनुशासनीय या रूपात दिसून येताहेत. विचारले तर सांगतात अलीकडे कोण मानतय या धर्मसंस्काराना! पण मुळात असे काही धर्मसंस्कार आहेत हेच त्यांना माहित नसते. पण आसरा घेतात मात्र कोण करतय/पाळतेय हे धर्मसंस्कार या विधानाचा. तर या प्रकरणात विवाहापासून अंतेष्टीपर्यंतच्या सर्व प्रमुख व सर्वश्रुत धर्मसंस्काराचा साद्यंत उहापोह केला आहे. या व्यतिरिक्तही अनेक धर्मसंस्कार आपल्या हिंदुधर्मातील अनेक धर्मग्रंथांत चर्चिलेले आढळतील. परंतु सर्वसाधारणपणे सद्याच्या काळात त्याचे वेगळे असे अनुकरण केले जात नाही जसे –

| | | |
|---|---|---|
| **पुंसवन*** | – | पुरुष संतान प्राप्तीसाठी करण्यात येणारा संस्कार |
| **अनवलोभत*** | – | गर्भपात होऊ नये म्हणून करण्यात येणारा संस्कार |
| **विष्णुबली*** | – | गर्भाचे उत्तम पोषण व्हावे म्हणून करण्यात येणारा संस्कार |
| **चुडाकर्म** | – | शेंडी ठेवण्याचा विधी |
| **वेदारंभ व केशांत** | – | शिक्षणास सुरुवात व शिक्षण पूर्ण झाल्यावर करण्यात येणारा विधी |

***टीप:***

*१) *आता हे विधी सर्वसाधारणपणे तज्ञ डॉक्टरांमार्फत केले जातात.*

*२) तर वेदारंभ व केशांत हे संस्कार आपण पाल्यास शालेय जीवनातून पुढे योग्य शिक्षण देण्याच्या माध्यमातून करीत असतो. मात्र चुडाकर्म हा विधी सर्वसाधारणपणे कोणीच करीत नाही.*

# विवाहसंस्कार

विवाहास लग्न असेही संबोधण्यात येते. लग्नास कोणी संस्कार म्हणतात, कोणी व्रत तर कोणी करार असेही म्हणतात. खरे पहाता, लग्न म्हणजे सक्षम भिन्न लिंगी व्यक्तिबरोबर सहजीवन सुरु करण्यासाठी कुटुंबियांनी आणि समाजाने दिलेली मान्यता त्याप्रमाणे सहधर्माचरण, सहनशीलता, संयम, सहकार्य व कर्तव्यदक्षता यांचे एक व्रत.

पाश्चात्य राष्ट्रात विवाह हा एक करार असतो तर आपल्याकडे तो एक संस्कार असतो. संस्काराने संयम निर्माण होऊन गुण वाढतात व दोष कमी होतात आणि म्हणूनच संस्कार हे जन्म जन्मांतरी फलदायी होतात. त्यामुळेच आपल्याकडील विवाह हे काही अपवाद वगळता टिकून रहातात. खरे पहाता लग्न हा आयुष्यातील महत्वाचा टप्पा आहे. वय झालं म्हणून आता करायला हवं म्हणून लग्न करणे हे जरी योग्य असले तरी आपले वैचारिक बंध (Wave length) एखाद्याशी जुळतात का ? ती व्यक्ति आपणांस आवडते का ? अगदी त्याच्या गुणदोषांसहीत, हे स्वत:चं, स्वत:च तपासून पहाणे महत्वाचे असते. कारण लग्न म्हणजे विधी नव्हे...... लग्न म्हणजे गोतावळा जमविणे नव्हे ...... लग्न म्हणजे सोहळा नव्हे ...... लग्न म्हणजे मंगळसूत्र बांधणे नव्हे...... लग्न म्हणजे आणाभाका घेणे नव्हे तर लग्न म्हणजे एकमेकांना मनापासून स्वीकारणे आहे. अगदी एकमेकांच्या गुण दोषांसहीत! म्हणूनच लग्न हा एक उपचार आहे, संस्कार आहे.

अशा या विवाहाचे, लग्नाचे ब्राह्म, आर्ष, दैव, प्राजपत्य, गांधर्व, आसुर, राक्षस व पीशाच्य असे एकूण आठ प्रकार धर्मशास्त्रात वर्णन केले आहेत. त्यांचे स्वरुप असे,

(१) **ब्राह्म विवाह** : या संस्कारात यथाशक्ती, सालंकृत कन्या उदक धारेसह वराला दान करण्यात येते.

(२) **दैव विवाह** : या संस्कारात यज्ञकर्मामध्ये योग्य अशा ऋत्विजाला (मुलाला) सालंकृत कन्येचे दान केले जाते.

(३) **आर्ष विवाह** : वराकडून दोन गाई घेऊन कन्यादान केले तर तो आर्ष विवाह होतो.

(४) **प्राजापत्य विवाह** : वधु-वरांनी एक विचाराने धर्माचरण करावे असा नियम घालून कन्यादान करणे म्हणजे 'प्राजापत्य' विवाह होय.

(५) **गांधर्व विवाह** : वधु–वरांनी स्वतःच्या पसंतीने परस्परांना निश्चित करुन विवाह करणे म्हणजे 'गांधर्व' विवाह होय. (म्हणजेच आजचा प्रेमविवाह)

(६) **आसुर विवाह** : वराकडून काही द्रव्य घेऊन त्याला कन्या दिल्यास तो 'आसुर विवाह' ठरतो.

(७) **पैशाच्य विवाह** : मुलीला पळवून नेऊन विवाह करणे म्हणजे 'पैशाच्य विवाह ' होय.

(८) **राक्षस विवाह** : वधु पक्षातील लोकांशी मारामारी करुन मुलीची नाखुषी असतांना तिला जबरदस्तीने पळवून नेऊन विवाह करणे म्हणजे 'राक्षस विवाह' होय.

या आठ प्रकारात ब्राम्ह्य विवाह सर्वोत्तम मानला गेला असून आजकाल होणारी बहुतेक सारी लग्ने या ब्राह्मविधीनेच होतात. अर्थात, अलीकडे गांधर्व विवाहही प्रचलीत आहेत.

**विवाहाचा/लग्नाचा विचार** : आपल्याकडे सगोत्र(जर गोत्र एकच असेल तर) विवाह करु नये असे शास्त्र आहे. सगोत्र विवाह म्हणजे बहीण भावाचे लग्न करण्यासारखे आहे. कारण त्यात वधुवर दोघांचाही मूळ पुरुष एकच असतो. म्हणजे रक्तही एकच असते. एक रक्तसंबंध करु नये हे वैद्यकीय शास्त्रचेही म्हणणे आहे.

मुलाकडील त्याचप्रमाणे मुलीकडील मंडळींनी परस्परांच्या स्थितीचा अंदाज घेऊन त्याप्रमाणेच पुढे जावे.

आजकाल जन्मपत्रिका/कुंडल्याच्या आधारे, लग्न जमविण्याच्या पध्दतीने फारच जोर धरलेला आढळून येत आहे. पत्रिका म्हणजे व्यक्तिच्या जन्मवेळी नवग्रह कोणत्या जागी होते याचा आलेख. जन्मवेळ व स्थळ अगदी तंतोतत बरोबर नसली तर पत्रिकेत फार फरक पडतो. म्हणून केवळ पत्रिकेवरच अवलंबून न रहाता उभय पक्षांनी खालील गोष्टींचाही विचार करणे आवश्यक आहे व त्यावरुन त्यांचे समाधान झाले तरच पसंतीचा निर्णय घ्यावा. केवळ पत्रिका, रंग, रुप, पैसा यातील एकावरच निर्णय घेऊ नये. संकल्पित वधूच्या अथवा वराच्या

(१) कुटुंबाची सांपत्तिक स्थिती (२) त्यांच्या आप्तेष्टांची सामाजिक प्रतिष्ठा (३) वराचे व वधुचे वय. वर वधुपेक्षा मोठा असावा (त्यात सर्वसाधारणपणे दोन ते तीन वर्षाचे अंतर असावे) (४) शिक्षण (५) उंची (६) रंग (७) शरीरयष्ठी (८) व्यक्तिमत्वाची छाप (९) चारित्र्य (१०) वर्तणूक (११) उत्कर्षाच्या भावी संधी (१२) त्यांचे रहाणीमान (१३) वधूवरांची वैचारिक पातळी यांचाही विचार प्रामुख्याने करणे आवश्यक असते. पत्रिका जमली म्हणजे दोघे एकमेकांना अनुरुप असणारच, आणि जुळली नाही म्हणजे दोघांचे एकमेकांशी जमणारच नाही असे पक्के समजणे व या समजुतीपायी आयुष्यातील एक अत्यंत महत्वाचा निर्णय पत्रिका बघणाऱ्या एका परक्या माणसाच्या हाती, बऱ्याच वेळा त्याच्या अर्धवट ज्ञानावर सोपवला जातो हे आपण विसरतो. म्हणूनच पत्रिका पहाणे हा एक मुद्दा असावा पण तो एकमेव पर्याय असू नये. त्याचप्रमाणे आपल्या ग्रामदेवतेकडे विचारणा करुन किंवा तिला कौल लावून लग्नसंबंध जमविणे ही सुध्दा एक अंधश्रध्दाच आहे. पत्रिका जमणे, देवाने कौल देणे याप्रमाणे सर्व काही यथायोग्य असूनही झालेली लग्ने मोडल्याची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच मला येथे प्रामाणिकपणे निवेदन करायचे आहे की, लग्नसंबंध जमल्यावर आपल्या ग्रामदेवतेकडे विनम्रपणे सांगणे करुन तिचा/त्याचा आशीर्वाद घ्यावा. परंतु असे कौल प्रसाद घेत बसू नये.

वधुवरांची इच्छा आणि पसंती याखेरीज इतर अनेक कारणांसाठी पालक मुलांची लग्ने लावतात जसे (१) आजी आजोबांसमोर लग्न व्हावे (२) मुलाच्या आईची तब्येत बरी नसते (३) वधुवरांपैकी कोणा एकास जर काही मनोविकार असतील तर ते लग्नानेच बरे होतील (४) मुलाचे व्यसन सुटेल (५) मुलीला मागणी आली म्हणून. मात्र अशा कारणांसाठी केलेली लग्ने फार क्वचितच सुखाची होतात.

तर अशाप्रकारे वरील सर्व मुद्यांचा सांगोपांग विचार करुन वधु-वरांना पहाण्याचा कार्यक्रम घडवून आणून एकदा का उभयतांची पसंता पसंती झाली की लग्न सोहळ्याच्या पुढील तयारीस लागण्यापूर्वी उभय पक्षांनी एक बैठक घेऊन काही व्यवहारिक गोष्टींचा स्पष्ट व सांगोपांग विचार करुन दोन्ही पक्षांच्या हितात निर्णय घेणे आवश्यक असते की, जेणेकरुन त्यामुळे भविष्यातील कटूता टाळता येईल. या बैठकीत मुख्यत्वे पुढील बाबतीत एकमत होणे हिताचे असते.

(१) लग्न कार्य - सर्वसाधारण/वैदिक/रजिस्टर पध्दतीने करावे? (२)

लग्नस्थळ (३) लग्नाची तारीख (४) वेळ (५) मुहूर्त (६) पुरोहीत प्रत्येकाने आपआपले आणावेत की वधूपक्षानेच व्यवस्था करावी, की दोन्हीं पक्षांनी मिळून एकच पुरोहित आणावा? (७) लग्नासाठी आवश्यक ते कार्यालय, धार्मिक विधी त्याचप्रमाणे अल्पोपहार, जेवणावळी, फोटो, वाजंत्री, सजावट इत्यादीसाठी होणारा खर्च दोन्हीं पक्षांनी अर्धा अर्धा करावा की वधूपक्षानेच करावा? (८) अल्पोपहार व जेवणात कोणते पदार्थ असावेत (९) प्रत्येक पक्षाकडून जेवणास/अल्पोपहारास किती माणसे येतील? (१०) उभय पक्षांकडून कोणते मानपान करवून घेणे आवश्यक आहे? (११) लग्नसोहळा व स्वागत समारंभ एकाच दिवशी किंवा निरनिराळ्या दिवशी ठेवावा? (१२) लग्नात आहेर घ्यावेत की घेऊ नयेत. घ्यायचे नसल्यास पत्रिकेवर तसे छापावे (१३) आमंत्रण पत्रिका उभय पक्षांनी वेगवेगळ्या की एकत्र छापाव्यात इत्यादी.

## साखरपुडा

देण्याघेण्याचे व्यवहार एकमताने संमत झाल्यानंतर साखरपुड्याचा दिवस व वेळ निश्चित करुन पुढील कामास लागावे.

पूर्वी साखरपुडा करीत नव्हते. लग्नापूर्वी देवांस नारळ देऊन नवरीची फक्त ओटी भरण्याचा विधी असायचा. हा विधी लग्नापूर्वी सोईस्कर दिवस पाहून किंवा लग्नसोहळ्याच्या दिवशीच सकाळी उरकून घेण्यात येई. त्यावेळी रितसर देवास गाऱ्हाणे/सांगणे करण्यात येत असे. तसे पाहिले तर साखरपुडा हा लग्न सोहळ्यापैकी एक लौकीक विधी आहे. धार्मिक नाही. लग्नातील धार्मिक विधींची साखरपुडा हा एक लौकीक नांदी होय. हा विधी वधुच्या घरीच करण्यात येतो. त्यावेळी वराकडील मंडळी नातेवाईक पाहुण्यासहीत वधुच्या घरी येतात. त्याठिकाणी जमलेल्या लग्नासंबंधीची वर व वधुकडील मंडळीच्या उपस्थितीत जाहीरपणे वाच्यता करण्यापूर्वी वधुकडील वडील व्यक्ती आपल्या पाहुणे व नातेवाईकांची परवानगी घेऊन वधुला वराकडील पाहुणे मंडळींना दाखविण्यासाठी आणतात.त्यावेळी वधू पाहुण्यांसमोर येऊन त्यांच्यासमोर तांदुळ/अक्षता उधळून सर्वांना नमस्कार करुन उभी रहाते. वराकडील एखादी ज्येष्ठ व्यक्ती वधूला प्रश्न विचारुन तिची माहिती मिळवतात. तद्नंतर वराकडील मंडळी वधुकडील मंडळीना वर दाखविण्याचा सोहळा करतात, त्यानंतर वधुकडील मंडळी वराची विचारपूस करतात. अशाप्रकारे

वर, वधुला पहाण्याचा कार्यक्रम झाल्यावर एकमेकांची पसंतापसंती विचारली जाते. पसंती झाल्यावर दोन्हीं पक्षाकडील ज्येष्ठ व्यक्ति वर व वधु पित्याला लग्न सोहळ्यातील व्यवहारीक बाबतीत त्या दोघात एकमत झाले आहे का ते विचारतात, उत्तर हो असेल तर साखरपुड्याच्या पुढील विधीस मान्यता देऊन वधु व वराच्या माता पित्यांनी पूर्वीच जुळवलेल्या या पहाण्याच्या कार्यक्रमास दोन्हीं पक्षांकडील नातेवाईक व पाहुणे मंडळीसमोर जाहीरपणे वाच्यता करुन सर्वसंमती मिळविण्यात येते व विवाह संबंध जमल्याची औपचारीकता जाहीरपणे करण्यात येऊन साखरपुड्याच्या विधीस सुरुवात करण्यात येते.

### साखरपुड्यासाठी आवश्यक साहीत्य :

**वराकडील बाजूसाठी** – नवरीसाठी साडीचोळी, ओटी म्हणजेच पाच नारळ, पाच प्रकारची फळे, बाजारात मिळणारे नवरीच्या ओटीचे सामान (यात अखखी हळकुंड व बदाम, अक्रोड वगैरे वस्तु असतात, सव्वा किलो (शेर) तांदूळ, हळद, कुंकू वेणी इत्यादि), त्याचप्रमाणे साखर पेढे, देवासाठी नारळ(पाच), देठाची पाने २५, अख्या सुपाऱ्या १०, उदबत्त्या, काड्यापेटी, कापूस, तेल समईसाठी, सुटी नाणी १५ रुपयांची, वधुसाठी सोन्याची आंगठी.

**वधुकडील बाजूसाठी** : देवासाठी नारळ ५, देठाची पाने, अख्या सुपाऱ्या, हळदकुंकू, समई/निरांजन, रांगोळी, कापूस, तेल, काड्यापेटी, तांदूळ, नारळ फोडण्यासाठी कोयता, १ ताट (नारळ फोडल्यावर नारळाचे पाणी साठविण्यासाठी )सुटी नाणी १५ रुपयांची, आंब्याच्या दोन डहाळ्या(टाळ), फुलांचे एक तोरण दरवाजासाठी व पुजेसाठी सुटी फुले, आंब्याची सुटी पाने १५-२०, चार पाट, परात(वराकडून वधुसाठी आणलेली ओटी ठेवण्यासाठी) पाहुणे मंडळींसाठी आवश्यक त्या चहापान फराळाची आपल्या सोईप्रमाणे व पूर्वी ठरल्याप्रमाणे व्यवस्था, वरासाठी आपणांस वाटले तर भेटवस्तु-शर्ट-पँट पीस किंवा इतर काही. वराकडील ओटी आणणाऱ्या पाच सुवासिनींची ओटी भरण्यासाठी नारळ व खण(ब्लाऊज पिसेस) दहा ते पंधरा, वरासाठी सोन्याची आंगठी.

**साखरपुडा विधी :** प्रथम वधु-वराकडील मंडळी पूर्व दिशेस तोंड करुन प्रत्येकी दोन दोन पाटांची बाजू-बाजुला मांडणी करुन त्या भोवताली रांगोळी (त्यात कुंकवाचा अंश मिसळून) काढतात. त्यानंतर आपापल्या

गावच्या चालीरितीप्रमाणे आपल्या गावच्या देवांसाठी नारळ, आंब्याची पाने, विडे(सुपारी व नाण्यासहीत) मांडतात. साखरपुडा करण्याच्या ठिकाणी छतास एक व प्रवेशद्वारावर एक असे आंब्याचे डहाळ(टाळ) बांधतात.

**पाटावरील मांडणी :** सर्वसाधारणपणे साखरपुडा मुंबईस किंवा मुंबईखेरीज इतर ठिकाणी म्हणजे आपल्या गावाच्या बाहेर असल्यास, आपली ग्रामदेवता, त्या त्या ठिकाणची स्थानिक देवता (मुंबईत असल्यास मुंबादेवी) त्याचप्रमाणे मुलाकडील व मुलीकडील मंडळीनी मुलाच्या व मुलीच्या मामांच्या ग्रामदेवतेच्या नावाने (म्हणजेच मावळेवसाच्या नावाने) आणि आपण ज्या वास्तुत साखरपुडा विधी करीत असू त्या ठिकाणच्या वास्तुपुरुष/ठिकाणदाराच्या नावे प्रत्येकी एक एक नारळ ठेवावा, तसेच आपापल्या इतर ग्रामदेवतांच्या व स्थानिक चुकल्या-माकल्या देवतांच्या नावे आंब्याची सात पाने व पाच विडे आपापल्या पाटांवर मांडावेत. पाटांच्यासमोर समई/निरांजन व उदबत्ती लावावी. त्यानंतर पाटावरील मांडणीतील नारळ, आंब्याची पाने व विड्यांवर वर व वधु त्याचप्रमाणे दोन्हींकडील मंडळीनी हळद-कुंकू, अक्षता वहाव्यात व प्रामुख्याने सुवासिनींनी हळद-कंकू व अक्षता वाहून त्यानंतर दोन्हीकडील एका एका ज्येष्ठ व्यक्तीने आपापल्या देवांस हा जमलेला लग्न विधी विना विघ्न पार पाडण्यासाठी प्रार्थना/ गाऱ्हाणे करावे(टिप : गाऱ्हाणे येत नसल्यास याच पुस्तकातील गाऱ्हाणी या सदरातील साखरपुड्यासाठीचे गाऱ्हाणे पहावे). गाऱ्हाणे प्रथम वधुकडील मंडळीनी व नंतर वराकडील मंडळीनी सांगावे अशी प्रथा आहे. गाऱ्हाणे झाल्यावर पाटावर मांडलेल्या देवतांसाठीच्या नारळ, आंब्याची पाने, विडे यावर सर्व मंडळीनी फुले, अक्षता वहाव्यात.

***टीप:***

*साखरपुडा ज्या वास्तुत असेल त्या वास्तुत किंवा मंडपात मुख्य दरवाजावर फुलांचे तोरण व आंब्याची डहाळी (टाळ) व ज्या ठिकाणी साखरपुड्यासाठी पाटांची मांडणी करावयाची त्या ठिकाणी छतास आंब्याची डहाळी (टाळ) बांधवा) दोन्हींकडील गाऱ्हाणी झाल्यावर मांडणीवर ठेवलेले आपापले नारळ वधु-वरांकडील मंडळींनी वाढवावेत (फोडावेत) त्यांचे पाणी तेथील तुळशीवृंदावनात किंवा एखाद्या झाडाच्या मुळात टाकावे व तद्नंतर फोडलेल्या नारळांची खिरापत करुन त्यात वराकडील मंडळीनी आणलेली साखर मिसळून जमलेल्या मंडळीना वाटावी. अशाप्रकारे साखरपुड्याचा विधी संपन्न झाल्यावर वराकडील मंडळींनी वधुसाठी आणलेली ओटी म्हणजेच साडी-चोळी व इतर ओटीचे सामान म्हणजे पाच नारळ, पाच प्रकारची फळे, बाजारात मिळणारे नवरीच्या ओटीचे सामान(यात*

हळकुंडे, बदाम, अक्रोड वगैरे वस्तु असतात) तांदूळ इत्यादी वधुकडील मंडळींकडून मोठी परात घेऊन त्यात काढावेत आणि ही ओटीने भरलेली परात वराकडील पाच सुवासिनींनी वधुच्या घरच्या देवाजवळ किंवा वरीलप्रमाणे मांडणी केलेल्या पाटासमोर एका पाटावर आणून ठेवावी. त्यानंतर वधुकडील मंडळीनी पुन्हा देवास वधुची ओटी अखंड सुरक्षित रहावी असे गाऱ्हाणे सांगावे (गाऱ्हाण्यासाठी ओटी म नवण्यासाठीचे गाऱ्हाणे पहावे). ओटी मानवून झाल्यावर वराकडील पाच सुवासिनींनी ही ओटी उचलून वधुकडे न्यावी. वधुने वराकडून आलेली साडी-चोळी परिधान करावी व रितसरपणे वराकडील सुवासिनींनी वधुची ओटी भरण्याचा विधी करावा. वधुकडील सुवासिनींनी वराकडील ज्या सुवासिनी ओटी घेऊन आल्या असतील त्या सर्व सुवासिनींची हळद-कुंकू वाहून खणा नारळांनी ओटी भरुन त्यांची पाठवण करावी. अशाप्रकारे वधुच्या ओटी भरण्याचा विधी संपन्न झाल्यानंतर वधु-वरांनी एकमेकांस आपणाकडून आणलेल्या अंगठी घालण्याचा विधी असतो तो करावा व साखरपुडा/वाङ्निश्चय झाल्याचे प्रमाणित करावे. अंगठी ही सर्वसाधारणपणे मुलाच्या(वराच्या) धाकट्या भावाने प्रथम आपल्या होणाऱ्या वहिनीच्या म्हणजेच नववधुच्या उजव्या हाताच्या अनामिकेत(करंगळीजवळच्या बोटात) घालावी व त्यानंतर वधुने वराच्या उजव्या अनामिकमेत घालावी असा संकेत आहे. त्यानंतर वराच्या धाकट्या बंधूने वधुच्या तोंडात पेढा घालावा व साखरपुडा संपन्न झाल्याचे संकेत द्यावेत.

**टीप:**

हा अंगठी घालण्याचा किंवा पेढा भरविण्याचा विधी आपल्या धर्मशास्त्रात/संस्कृतीत नाही. तो लौकीक विधी असून १५० वर्षाच्या इंग्रजांच्या राजवटीमुळे आम्हा भारतीयांनी ज्या काही पाश्चात्य पध्दतींचा आपल्या संस्कृतीत समावेश करुन घेतला त्यापैकीच ही एक पध्दत आहे आणि म्हणूनच वराच्या धाकट्या बंधूऐवजी पाश्चात्यांप्रमाणे वरानेच वधुच्या हातात अंगठी घालणे योग्य होय. परंतु आपण त्यात आपल्या सोयीनुसार सुधारणा करुन वराऐवजी हा मान वराच्या धाकट्या बंधूस देतो. कदाचित इतर सर्व नातेवाईकांसमोर वधूचा हात हातात घेण्यास वर लाजण्याची शक्यता असेल असा आपला गैरसमज असावा. आणखी एक लक्षात येण्यासारखी प्रथा आपण इंग्रज्यांकडून अंगिकारली ती म्हणजे वाढदिवसाच्या दिवशी वाढदिवस असलेल्या व्यक्तिचे औक्षण करण्याची(म्हणजे आरती ओवाळण्याची) प्रथा आपल्या संस्कृतीत आहे त्याऐवजी आपण पाश्चात्यांप्रमाणे सर्रास मेणबत्त्या लावून त्या विझविण्याचा विधी करतो. आपल्या प्रथेप्रमाणे औक्षणात वाढदिवसाच्या संखेप्रमाणे दिवे लावतो व येणाऱ्या पुढील आयुष्याबरोबरच गत आयुष्याला उजाळा देण्याचा प्रयत्न करतो. तर पाश्चात्यांच्या प्रथेत वाढदिवसांच्या संखेएवढ्या मेणबत्या लावून त्या विझवल्या जातात व गत आयुष्याला तिलांजली दिली जाते. असो. तर आपला साखरपुडा विधी हा सुरुवातीच्या गाऱ्हाण्यानंतर फोडण्यात येणाऱ्या नारळ या विधीनंतरच संपन्न होतो आणि म्हणूनच तो विधी झाल्यावर वर-वधुंचा साखरपुडा झाला असे समजून वधुची पुढील वैवाहिक जीवनाची सुरुवात म्हणून सुवासिनींच्या हस्ते वधूची ओटी भरण्यात

येते.

अशाप्रकारे बघण्याचा व ओटी भरण्याचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर दोन्हींकडील ज्येष्ठ मंडळींनी आपापल्याकडील पाहुण्यांची ओळख करुन द्यावी/घ्यावी. पाहुण्यांना फराळ-चहा-पाणी द्यावे. त्या दरम्यान ओटी भरण्याचा विधी संपन्न झालेला असल्याने वधुने वराकडून आलेली नवीन साडीचोळी परिधान करुन ओटीसहीत वराबरोबर पुन्हा सर्व उपस्थित पाहुणे मंडळी व ज्येष्ठांच्यासमोर येऊन त्यांच्या पाया पडून त्यांचे आशीर्वाद घ्यावेत. सर्व विधी संपन्न झाल्यावर वधूच्या वडीलांनी किंवा तिच्याकडील ज्येष्ठांनी वरासाठी आणलेली भेटवस्तू देऊन त्यास आशीर्वाद द्यावेत व साखरपुडा समारंभाची पूर्तता करुन लग्नविधीच्या पुढील तयारीस लागावे.

इथे एक गोष्ट मुद्दाम नमूद करावीशी वाटते की, आज जागतिकीकरणामुळे (Globalisation) आपला साखरपुडा हा एक धार्मिक विधी (RITE) आहे हे गौण होत चालले आहे व त्याला उत्सवाचे (EVENT) स्वरुप येत चालले आहे. म्हणजे विधी (RITE) थोडा आणि उत्सव (EVENT) जास्त. कदाचित आपल्या आताच्या पिढीचे या (RITE) आणि (EVENT) यातील फरकाकडे दुर्लक्ष होत चालले आहे किंवा तो त्यांना कदाचित माहीत नसावा. किंवा सोयीस्कररित्या ते तो विसरत असावेत. इंग्रजी शब्दकोशाप्रमाणे (RITE) म्हणजे धार्मिक नियम-नियमावली तर (EVENT) म्हणजे उत्सव, मौज मजा हा अर्थ सर्वश्रुत आहे. त्यामुळे अलिकडे 'साखरपुडा' हा विधी **इंग्रजाळत** चालला आहे आणि त्याचे (EVENT) मध्ये म्हणजेच सोहळ्यात/उत्सावात रुपांतर होत आहे. आपण परिस्थिबरोबर जरुर बदलावे पण किती? यालाही मर्यादा असावी. चांगले ते अंगिकारावे व ते आपल्यात सामावून घ्यावे हाच तर खरा हिंदु धर्म! हिंदु संस्कृती!! आणि म्हणूनच आपण आपल्या स्वत:स हिंदु मानत असू तर आपल्या धर्माचे रितीरिवाज पाळणे हे आपल्यावर बंधनकारक आहे. ते सर्व विधी यथासांग पार पाडल्यावर काय मौज मजा करायची ती करा ना! कोणी अडविले आहे तुम्हाला? पण ठराविक मयादेपर्यंतच. आज काही साखरपुड्यात मी पाहिले आहे ''वर'' गुडघे टेकून ''वधूस'' गुलाब देतो. नंतर तिला आंगठी घालतो, इथपर्यंत ठीक. पण नंतर वर व वधु एकमेकांना मिठी मारतात. वर वधुचे चुंबन घेतो...??. हे मात्र अति होते. हे ख्रिस्ती धर्मियांचे/इंग्रजांचे विधी आहेत. त्यांचे आपण अंधानुकरण करीत आहोत. हे जरा अतीच वाटते. मला

हे सांगा की, इंग्रजांनी/ख्रिस्ती धर्मियांनी कधी नारळ फोडून, गाऱ्हाणे घालून, ओटी भरुन साखरपुडा करण्याचा विधी स्वीकारल्याचे आपण कोणी पाहिले आहे का? मग आपण त्यांच्या या अवाजवी रुढींचे अनुकरण का करावे? तुम्हास माहिती व्हावे यासाठीच आपल्या या विधीची साद्यंत माहिती माझ्या या प्रकरणात दिली आहेच की, जेणेकरुन आपण आपला साखरपुडा हा एक हिंदुधर्मीय संस्कार आहे याची आठवण ठेवून; होऊ घातलेले हे अवाजवी इंग्रजी अंधानुकरण थांबवावे, हीच सदिच्छा !!

## लग्न सोहळा

### लग्नाच्या पूर्वीचे विधी :

**(१) हळदीचा कार्यक्रम**

तसे पाहिले तर हा विधी देवक बसविल्यावर मंडपात आंब्याच्या डहाळीचा खांब उभारुन त्या खांबाला प्रातिनिधीक स्वरुपात हळद चढविल्यावर(हळद चढविणे म्हणजे वाटीत पाण्यात हळद भिजवून उपस्थित सुवासिनी/कुमारीकांनी त्या मिश्रणात दोन हातात दोन आंब्याची पाने घेऊन त्या पानांची टोके बुडवून प्रथम जमिनीला टेकवावीत नंतर खांबाच्या मध्यावर व नंतर शेंड्याला या क्रमाने टेकवावे. अशाप्रकारे पाच वेळा करावे) नंतर वर किंवा वधूला त्याच पध्दतीने एकूण पाच सुवासिनींनी ही हळद पायापासून डोक्यापर्यंत म्हणजेच अंगठे, गुडघे व डोके (डोके म्हणजे टाळूवर) अशा क्रम ाने चढवावयाची असते. पूर्वी खेड्यात देवक बसविण्याचा विधी हा लग्नाच्या आदल्या दिवशी होत असे. त्यामुळे हळद चढविण्याचा विधी त्यावेळेला होत असे. परंतु सद्याच्या धावपळीच्या शहरी जीवनात वेळेअभावी हा विधी लग्नादिवशीच लग्नमूर्हताच्या पूर्वी एक ते दीड तास आधी केला जातो. तरीही एक लौकीक विधी म्हणून हळदीचा विधी हा लग्नाच्या पूर्वसंधेस घरी करण्यात येतो. त्यावेळी वर वधूच्या घरी आलेल्या कुमारिका व सुवासिनींना हिरव्या बांगड्या, बांगडीवाल्यास बोलावून त्याच्याकडून भरवून घेतात. नवरीच्या घरी नवरीस/वधूस भरण्यात आलेल्या हिरव्या बांगड्यांना ''हिरवा चुडा'' असे म्हणतात. तद्नंतर नवरा नवरीस त्यांच्या त्यांच्या घरी वर उल्लेखिल्या पध्दतीने आलेल्या सुवासिनींकडून हळद चढविली जाते. त्यावेळी हळद ही उपस्थित सर्व मंडळीस लावून आनंदोत्सव करण्यात येतो. तद्नंतर नवरा किंवा नवरीस

घरच्या गोड शकाहारी फराळाचे केळवण करुन नंतर समारंभास हजर असलेल्या पाहूणे मंडळी व मित्रमैत्रिणीसाठी जेवणाचा/गाण्यांचा कार्यक्रम केला जातो. (अलीकडे पाहुणे मंडळी व मित्रमैत्रिणींना मांसाहारी जेवण द्यायची प्रथा सुरु झाली आहे.)

हळदीच्या कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी नवरी व तिच्या मैत्रिणी व इतर सुवासिनींना बोलावून मेहंदी लावण्याचाही कार्यक्रम करण्याचा प्रघात अलीकडे अगदी आवर्जून केला जातो. (टिप : हळदीच्या कार्यक्रमास सर्वसाधारणत: आंबेहळद वापरावी.)

**लग्नादिवशी लग्न विधी सुरु होण्यापूर्वी :**

लग्नाच्या सकाळी घरातून मंगल कार्यालयाकडे निघताना घरच्या देवाची पूजा करुन त्यांना गाऱ्हाणे घालावे (गाऱ्हाण्यासाठी गाऱ्हाणे सदरातील मंगल कार्यालयाकडे निघतानाचे गाऱ्हाणे पहावे) व गोड शिरा किंवा तत्सम पदार्थांचा नेवैद्य दाखविणे आवश्यक आहे. कारण आपण मंगल कार्यात लग्नाचा सोहळा साजरा करतो व मंगल कार्यालय हे आपल्या घरापासून दूर असल्यामुळे जेवणापूर्वी आपल्या देवास नैवद्य ठेवण्यासाठी सोईचे होत नाही.

**१) देवक बसविणे.**

मंगल कार्यालयात निघताना वधूची ओटी भरुन पाठवणी करावी. वधु किंवा वराच्या अंगावरुन नारळ काढून तो रस्त्यावर फोडण्याची प्रथा आहे. मंगल कार्यालयात गेल्यावर ब्राम्हण म्हणजेच गुरुजींकडून वर/वधूंचे देवक बसविण्याचा विधी होतो. देवक बसविण्यपूर्वी मंगल कार्यालयात आंब्याच्या डहाळीचा खांब योग्य त्या ठिकाणी गुरुजींच्या सहमतीने उभारावा व मंडप देवतेचे प्रतिक म्हणून त्याची पूजा करावी. आणि तद्नंतर देवक बसविण्याचा विधी सुरु करावा. या विधीत आपल्या कुलगोत्राप्रमाणे प्रमाणित कुळाची (कुळ म्हणजे आपल्या गोत्रानुसार एक विशिष्ट वनस्पती धर्मशास्त्रानुसार प्रमाणित केलेली असते त्याची माहिती आपल्या गोत्रातील वडिलधाऱ्या व्यक्तिंकडून करुन ठेवणे आवश्यक असते.) प्रतिस्थापना करावी. त्यावेळी नवीन रोवळीत (याला मालवणीत येरवण असेही म्हणतात.) निरांजन, कुळाच्या फांदीची प्रतिस्थापना गुरुजींकरवी करुन एका सुपात ती रोवळी घेऊन यजमानांनी ते सुप घेऊन यजमाननीच्या हातात पेटवलेली समई देऊन तिला पुढे करुन

त्या समईच्या प्रकाशात यजमानानी आपले कुळ घेऊन मंगलकार्यालयातील आपल्या खोलीत या कुळाची अथवा देवकाची स्थापना करुन त्यापुढील समईतील ज्योत, सर्व लग्नविधी होईपर्यंत तेवत राहील याची काळजी घ्यावी. अशाप्रकारे ब्राम्हणाच्या मार्गदर्शनाखाली देवक ठेवून झाल्यावर ब्राम्हणांकरवी घाणा भरण्याचा विधी सुरु करावा.

## २) घाणा भरणे.

घाणा भरताना एक मुसळ आंब्याच्या पानांनी सुशोभित करतात. म्हणजेच त्याच्या वरच्या टोकाकडील भागाला आंब्याचे पाने बांधण्याची प्रथा आहे. मग त्या मुसळाने उखळात किंवा रोवळीत उडीद, तांदूळ, सुपारी, हळकूंड घालून ती पाच सुवासिनी लग्नाचा वर(मुलाकडे) किंवा वधू (मुलीकडे) व यजमान यजमानीने मिळून कांडतात. कांडताना तीन वेळा हे मुसळ डोक्याला (वधु/वराच्या त्याचप्रमाणे यजमान यजमानीच्या) लावतात. रीती रिवाजाप्रमाणे यातील तांदूळ लग्नाच्या जेवणाच्या तांदूळात व उडीदाचे पीठ करुन ते वड्याच्या पीठात टाकावेत असा संकेत आहे. सद्या असे कोणी करीत नाहीत. कारण जेवणावळीचे कंत्राटच दिलेले असते. त्यामुळे स्वत: जेवण करण्याचा प्रश्नच नसतो. त्यानंतर वधुसाठी वराकडून हळद❖ पाठविण्यात येते, ती वधूस त्याचप्रमाणे मंडप देवतेच्या नावाने उभ्या केलेल्या आंब्याच्या डहाळीच्या खांबास चढविण्याची प्रथा आहे आणि हाच खरा हळदीचा कार्यक्रम की अलिकडे आपण तो आदल्या दिवशीच देवक बसविण्यापूर्वी करतो. अर्थात त्यावेळी येथेही खांबास हळद प्रथम चढविली जाते.

देवक बसविणे व घाणा भरणे हे दोन्हीं विधी ब्राह्मणाच्याकरवी शास्त्रोक्त पध्दतीने व मंत्रघोषातच पार पाडले जातात. वधूचे देवक वराच्या देवकाच्या पूर्वीच बसवावे असा संकेत आहे.

***❖ टिप :***
*नवऱ्याकडून आलेली हळद ही हळद नवऱ्यास चढविलेल्या हळदीतीलाच भाग असतो म्हणून तिला नवऱ्याची उष्टी हळद असे म्हणतात. शास्त्राप्रमाणे हीच उष्टी हळद नवरीस चढवावयाची असते. नवऱ्या मुलाच्या घरी आदल्या दिवशी करण्यात आलेल्या हळदीच्या विधीतीलच हळद उष्टी हळद म्हणून पाठविण्यात येते. किंवा मंगलकार्यामध्ये देवक बसविण्याचा विधी केला असेल तर नवऱ्याकडील मुहूर्त मेढीस व नवऱ्या मुलास हळद चढवल्यावरच ती हळद, उष्टी हळद म्हणून पाठवितात.*

## ३) पाहुणे अहेर

देवक बसविणे व घाणे भरण्याचा विधी झाल्यानंतर उपस्थित पाहूणे मंडळी तेथेच आहेर देण्याचा कार्यक्रम करतात. यास **पाहूणे आहेर** असे म्हणतात. हा एक अतिमहत्वाचा विधी असून जवळचे खास नातेवाईक व पाहूणे मंडळी यावेळेस त्या त्या यजमानास धोतर-शर्ट(आता शर्ट-पँट पीस), यजमाननीस नारळ, साडी-खण, नवऱ्यास/नवरीस योग्य तो यशाशक्ती आहेर व धेडा/धेडीस त्याचा/तिचा मान किंवा नारळ देतात. या विधीत आहेर देणाऱ्या व्यक्तिने किंवा उभयतांनी प्रथम सर्वांत म्हणजे धेडा/धेडी या क्रम ाने कुंकू व अक्षता लावून नंतर यजमान-यजमानीन नंतर वर/वधु यांना वर सांगितल्याप्रमाणे ज्याचा त्याला आहेर/मान देतात. काही पाहूणे फक्त वर/ वधूसच आहेर करतात. अशावेळी पूर्वी कोणी दिलेला यजमान यजमानीन यांचा आहेर त्यांच्या त्यांच्या हातात द्यायचा व आपण आणलेला आहेर वर/ वधू यांच्या हातात द्यायचा व धेडा/धेडीच्या हातातीत नारळाला हात लावून सर्वांस नमस्कार करण्याचा असा शिरस्ता आहे. प्रत्येकवेळी आहेर करुन झाल्यावर कोणा एका व्यक्तिने प्रत्येक वेळी आलेला आहेर वरील प्रत्येकाच्या मागे उभे राहून स्वत:कडे घेऊन शेवटी घरातील जबाबदार व्यक्तीच्या ताब्यात देणे आवश्यक असते. या सर्व विधीस पुण्याहवाचन असे म्हणतात. **या पावणे अहेराच्यावेळी अहेर करणाऱ्या पुरुषाने टोपी व सुवासिनीने डोक्यावर पदर घेण्याचा संकेत आहे. नवरीकडील पुण्याहवाचन झाल्यावर नवऱ्याचे पुण्याहवाचन करतात.**

अशाप्रकारे देवक ठेवून, घाणे भरुन, हळद चढवून, पाहूणे आहेर करुन पुण्याहवाचनाचा कार्यक्रम संपल्यानंतर नवऱ्यास किंवा नवरीस स्नान घालण्याचा विधी असतो. या विधीस मालवणीत ‘ निम सांडणे ’ असे म्हणतात.

## ४) निम सांडण्याचा विधी :

***टीप :***

*हा विधी म्हणजे वधू/वर आपल्या तारुण्यातून म्हणजेच आयुष्याच्या साधारणत: निम्म्या/अर्ध्या आयुष्यातून गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याच्यावेळी करण्यात येणारा विधी असतो म्हणूनच कदाचित या विधीला निम सांडण्याचा विधी असे म्हणत असावेत. म्हणूनच मालवणी भाषेत लग्नाला पात्र झालेल्या मुलाला ‘निमो ’ तर मुलीला ‘निम्या’ असे म्हणण्याची पध्दत आहे.*

या विधीची पार्श्वभूमी अशी आहे की, आता नवरा/नवरी ही आपल्या ब्रम्हचर्य आश्रमातून वैवाहिक जीवनात प्रवेश करणार असतात. म्हणजे त्यांच्या

तारुण्याच्या उंबरठ्यावरुन गृहस्थाश्रमात प्रवेश करणार असतात म्हणून त्यांनी विधीयुक्त स्नान करायचे असते. नवरा असेल तर त्याने न्हाव्याकडून दाढी करुन, केस कापून घेऊन नंतरच स्नान करायचे असते. नवऱ्याकडील या विधीस 'रेघ मारणे' असे म्हणतात. (अलिकडे वेळेअभावी हा रेघ मारण्याचा विधी आपल्या घरीच करण्यात येतो. त्यावेळेस न्हाव्यास टॉवेल किंवा शर्ट-पँटपीस देण्याचा प्रघात आहे. हा विधी करताना नवऱ्याच्या बहिणीने आरती घेऊन नवऱ्याच्या मागे उभे रहावयाचे असते.) या स्नानाच्यावेळी बाजारात निमाच्या काठ्या मिळतात. (यात सावर, उंबर व दिंडा यांच्या प्रत्येकी एक अशा तीन काठ्या असतात.) त्या आणून त्याच्या वरच्या टोकास पाच वडे व नारळ तांदूळाची ओटी बांधून त्या काठ्या त्रिकोणातील शंकूच्या आकारात पसरवून त्याच्या खाली वधुस किंवा वरास बसवावे. मात्र या काठ्यांचा स्पर्श वधु/वराच्या अंगास होणार नाही याची काळजी घ्यावी. नंतर पाच सुवासिनींनी तांब्याच्या कलशात थंड पाणी घेऊन ते ओतत वधु/वराच्या भोवती पाच प्रदक्षिणा घालाव्यात व नंतर पाणी त्यांच्या डोक्यावर ओतावे. यावेळी पाण्याच्या स्पर्शाने वधु/वराने घाबरून/दचकून अंग काढू नये. नंतर वधु/वरांनी त्या काठ्याच्या त्रिकोणातून हलकेच काठ्यांना स्पर्श न करता बाहेर यावे व थंड पाण्याने पूर्ण आंघोळ करुन ब्रम्हचर्य आश्रमाचा त्याग करावा. शेवटी त्या काठ्या कोयत्याने तोडून फेकून द्याव्यात. त्याचप्रमाणे वधु/वरांनी आंघोळीच्या वेळी भिजविलेले कपडेही फेकून द्यावेत.

अशाप्रकारे निम सांडण्याचा/मांगलिक स्नानाचा विधी झाल्यावर वधुवरांनी लग्नसोहळ्यासाठी आवश्यक तो पेहराव करावा. वधुने मामाने दिलेली पिवळी साडी नेसायची, कुंकवाचा मळवट भरावयाचा व मुंडावळ्या बांधून गौरीहरासमोर लग्नमुहूर्तापर्यंत बसून राहून आपले कल्याण व्हावे अशी प्रार्थना गौरीहराला करायची.(गौरीहराची पूजा करण्यासाठी पाटा व वरवंटा यावर हळदीने गौरी व शंकर यांची चित्रे काढून त्यासभोवती कोरे सूत बांधून दोन्हीं दगड देवाजवळ किंवा इतर पवित्र जागी ठेवावेत अशी प्रथा आहे. परंतु सोईसाठी म्हणून एका लाकडाच्या पाटावर किंवा चौरंगावर तांदुळाच्या राशीवर अन्नपूर्णेची मूर्ती ठेवतात व तिचीच पूजा केली जाते.) प्रार्थना करतेवेळी,

**गौरी गौरी सौभाग्य दे**
**दारी आलेल्या अतिथीस दीर्घायुष्य दे.**

असा मंत्र म्हणायचा. अतिथी म्हणजे बाहेर सिमांत पूजनासाठी आलेला नवराच असतो. मंत्र म्हणतेवेळी थोडे थोडे तांदूळ गौरीहारावर सोडायचे.

### ५) सिमांतपूजन

नवरी गौरीहर पूजनास बसली असता बाहेर नवऱ्याची वरात आलेली असते. त्याच्या सासू सासऱ्यांनी वराचे स्वागत करुन त्याचे पाय धुऊन त्याला जानोशाला बसवावयाचे असते. तेथे वर, वधूसाठी आणलेला मंगळसूत्रातील मुहूर्तमणी व काळे मणी दोन्हीं बाजूस पाच असे ओवून मंगळसूत्र तयार करतो. यासच मुहूर्तमणी ओवणे म्हणतात. अलीकडे याऐवजी आयते मुहूर्त मणी असलेले वेगळे एक पदरी मंगळसूत्र वापरण्यात येते. नंतर गुरुजी इतर सीमांत पूजनाचे विधी पार पाडतात. त्यानंतर नवऱ्याकडून नवरीसाठी आणलेले दागिने, मंगळसूत्र तसेच नवरीसाठी तसेच बाशींग/मुंडावळ्या मोठी साडी, हिरवी साडी व नवरीची ओटी यांची गुरुजींकडून विधीवत पूजा करुन वराकडील पाच सुवासिनी हे सर्व साहित्य नवरीकडे घेऊन जातात. त्याचप्रमाणे वधूकडून वरासाठी आणलेला पोशाखही विधीपूर्वक वराकडे पाठविण्यात येतो. त्या मुदतीत नवरीच्या बहिणीने आणलेला फराळ (रुखवत) ती नवऱ्याला वाढते. नवऱ्याने त्यास आपल्या उजव्या हाताच्या करंगळीने स्पर्श करुन स्वीकार करावयाचा व आपल्या मेहूणीचा साडी-चोळी देऊन सन्मान करायचा. अशाप्रकारे विधी संपन्न होत असताना नवऱ्याकडील सुवासिनींनी आणलेली नवरीची ओटी भरण्याचा विधी वधुकडील खोलीत किंवा घरात त्या संपन्न करीत असतात. तो झाल्यावर नवरी बोहल्यावर (लग्नमंडपात) जाण्यास सज्ज होते. ओटी घेऊन आलेल्या सुवासिनींची नारळ खणांनी ओटी भरुन वधुकडील मंडळींनी त्यांना सन्मानित करायचे असते.

इकडे आपल्या धेड्यासह नवरा बोहल्यावर आलेला असतो. धेड्याच्या हातात सजविलेला नारळ व सुरी असते. अलीकडे अशाप्रकारे सजविलेला नारळ व सुरी बाजारात तयार मिळतात. त्याचप्रमाणे त्याच्याबरोबर त्याच्या करवल्या म्हणजेच बहीणी त्यासोबत कलश-नारळ व आरती घेऊन त्याच्याम ागे उभ्या राहतात. मंगलाष्टका सुरु झालेल्या असतात. दोन ते चार मंगलाष्टका म्हणून झाल्यावर वधूच्या मामाने वधूला लग्नमंडपात लग्नाच्या बोहल्यावर आणावयाचे. वधूबरोबरही तिच्या बहिणी (करवल्या म्हणून) सोबत कलश नारळ व आरती घेऊन आलेल्या असतात. त्यांनी नवरीच्या मागे उभे

रहायचे. त्यांच्याबरोबर नवरा व नवरीकडील प्रत्येकी एका व्यक्तिकडे एका रोवळीत (येरवाणात) नारळ व तांदूळ घेऊन नवऱ्याच्या व वधूच्या डोक्यावर धरुन उभे रहायचे. तत्पूर्वी नवरा व नवरीस ब्राह्मणाकडून एक एक जीरे घातलेला पानाचा वीडा तोंडात ठेवण्यास दिला जातो.उद्देश हा की त्यांनी एकमेकांबरोबर माळ घालीपर्यंत बोलू नये. सर्वसाधारणपणे आठ मंगलाष्टके व नंतर ब्राह्मणांनी सर्वसाधारणपणे आठ मंत्र म्हणून झाल्यावर अंतरपाट बाजूला केल्यावर मुलीने प्रथम व नंतर मुलाने आंब्याच्या पानांची व नंतर फुलांची माळ घालून एकमेकांस सुमुहूर्तावर लग्नबंधनात बंदिस्त करुन घ्यायचे आणि आपल्या तोंडातील वीडे थंकून टाकायचे. त्यानंतर नवरीकडील करवल्यांनी नवऱ्याकडील करवल्यांची भेट घ्यायची व एकमेकांच्या कलशात आपापल्या कलशातील पाणी ओतायचे. दोन्हींकडील येरवणवाल्यांनी आपापली येरवणे एकमेकांकस भेटवून दोन्हीं कुळांचा (नवऱ्याकडील व नवरीकडील) संगम झाला असा संकेत करायचा. तद्नंतर वधूच्या मातापित्यांनी येऊन वधू-वरांच्या मस्तकावर अक्षता टाकायच्या असा संकेत आहे. तोपर्यंत त्यांनी वधूवरांचा चेहरा बघू नये असा संकेत आहे.

तद्नंतर सूत्रबंधन, कन्यादान, होमहवन, सप्तपदी इत्यादी धार्मिक विधी गुरुजींच्या माध्यमातून संपन्न होतात व लग्न सोहळा संपतो.

ज्यावेळी होम हवनासाठी लागणारा अग्नी नवऱ्याची बहीण घेऊन येते. त्यावेळी मुलीकडील मंडळींनी नवऱ्याच्या बहीणीचा सन्मान साडी-चोळी किंवा ड्रेस मटेरिअल देऊन करायचा असतो. तसेच ज्यावेळी होमात लाह्या घालण्यासाठी नवरीचा भाऊ येईल त्यावेळी नवऱ्याच्या कानपीळीचा व सप्तपदीचा विधी झाल्यावर मुलाकडील मंडळींनी नवरीच्या भावाचा सन्मान त्याला पोशाख देऊन करायचा असतो. तद्नंतर मुलीचे नाव ठेवण्याचा विधी झाल्यावर वधू-वर वधूच्या जागी वधूचे देवक हलविण्यास जातात. त्यावेळी त्यांच्याबरोबर वराचे मित्र असतात तेथे प्रार्थना, गाऱ्हाणे, नमस्कार केल्यानंतर वर वधुकडील देवकाची रोवळी हलवितो. नंतर वधूच्या माहेरकडील मंडळी त्या सर्व पाहूणे मंडळींचे गोड फराळाने स्वागत करतात व अशाप्रकारे विवाह सोहळा संपन्न होतो. यास उष्टावळ असे म्हणतात.

तद्नंतर स्वागत समारंभ, जेवणावळी झाल्यावर वधूला तिच्या घरी पाठविण्याचा एक भावस्पर्शी विधी वधूच्या घरी/मंडपात होतो. त्या विधीस

'हाती बेटी किंवा हाती बोटी' देण्याचा विधी असे म्हणतात. या विधीत नवरीकडील वयस्क व्यक्ती, नवरीच्या वडीलांच्यावतीने नवरीचा हात नवरीच्या सासूबाईच्या हातात देते व म्हणते, आजपर्यंत हातावरील फोडाप्रमाणे जपलेली माझी/आमची लेक आम्ही तुमच्या हातात सोपवत आहोत. तिला सांभाळून घ्या. तिचे काही चुकले तर सांभाळून घ्या, आपली लेक म्हणूनच तिचा सांभाळ करा वगैरे. त्यानंतर नवरीच्या सासू-सासऱ्यांचा विधीवत मानसन्मान साडी-चोळी, धोतर-उपरणे किंवा काही पर्यायी वस्तू देऊन करावा. यावेळी मुलीच्या आईला दिलेल्या साडीला **पोट झाकणीची** साडी असे म्हणतात. त्यानंतर नवरीची ओटीसह पाठवणी करुन तिच्या माहेरकडची ओटी नवरदेवाच्या मंडपाच्या किंवा घराच्या दरवाजात नवरदेवाकडील ओटीने बदलतात. नंतर नवरीने तिने नवऱ्याच्या घरात म्हणजेच आपल्या सासरच्या घराच्या प्रवेशद्वारातील उंबरठ्यावरील माप ओलांडून सासरी गृहप्रवेश करावयाचा. या विधीस गृहप्रवेश किंवा घरभरवणी असे म्हणतात. नवरदेवाकडील भरलेली ही ओटी पुढे नवरीने वर्षभर सांभाळून सासर माहेरी जाता येताना ती स्वत:बरोबरच ठेवावयाची असते. या ओटीत नारळ, तांदूळ, लग्नात दिलेली चांदीचा करंडा फणी ठेवायची असते.

**गृहप्रवेश किंवा घरभरवणी विधी –** लग्न सोहळा मंगल कार्यालयात किंवा हॉलवर संपन्न झाल्यावर नवरा नवरीस मिरवणूकीने वाजंत्र्यांच्या जल्लोषात नवऱ्याच्या (सासरच्या) घरी आणण्यात येते. या विधीस ''वरात'' असे म्हणतात. जवळच्या नातेवाईकांकरवी नवरा-नवरीस नवऱ्याच्या घरी आणले जाते. घरात येण्यापूर्वी वाटेत येणाऱ्या एखाद्या मंदिरात नवरा नवरीस घेऊन जावे व देवतांस वंदन करुन घरी निघावे. तेथे मंडप असेल तर त्या मंडपाच्या प्रवेशद्वारावर किंवा घराच्या प्रवेशद्वारावर नवरीच्या माहेरच्या ओटीची सासरच्या ओटीने अदलाबदल करुन नंतर सुवासिनींकडून नवरानवरीस ओवाळले जाते व त्यांचे स्वागत केल्यावर घराच्या उंबरठ्यावर तांदूळ भरुन एक गडू तांब्या किंवा बाजारात मिळणारे एक विशिष्ट प्रकारचे माप ठेवावे व त्याला नवरीने आपल्या उजव्या पायाच्या आंगठ्याने घरात ढकलून घरात प्रवेश करावा. या उंबरठ्यापासून घरातील देवघरातील देव्हाऱ्यापर्यंत एक सलग पायघडी घालून ठेवलेली असते. त्यावर तीन सुवासिनी उभ्या असतात. पैकी एकीच्या हातात प्रज्वलीत केलेला लामण दिवा (नंदादीप) असतो. सर्वसाधारणपणे ही

सुवासिनी ही सासूबाई किंवा सासरच्या घरातील ज्येष्ठ सुवासिनी असते, की ती घरात आलेल्या या गृहलक्ष्मीचे दिव्याच्या प्रकाशात स्वागत करण्यासाठी उभी असते. दुसरी सुवासिनी ही तांदूळ घेऊन उभी असते. येथे नवरीच्या हातात तांदूळ(अक्षता) देतात, तांदूळ घेतलेली सुवासिनी नवरीकडे तोंड करुन तांदूळाच्या मुठी पायघडीवर ठेवत मागे मागे जाते. त्या तांदुळाच्या मुठीवर पाय देत देत नवरीने नंदादीप घेतलेल्या सुवासिनीच्या हातातील नंदादीपात आपल्या हातातील तांदूळ सोडत ती सुवासिनी जशी जशी मागे जाईल तसे तसे नवरीने पुढे पुढे जायचे. नवरा-नवरीच्या मागून तिसऱ्या सुवासिनीने ती पायघडी गुंडाळीत पुढे सरकायचे(कारण या पाय घडीवर ठेवलेल्या तांदळांवर इतर कोणाचा पाय पडू नये) अशाप्रकारे नंदादीप घेतलेल्या व तांदुळांच्या मुठी ठेवणाऱ्या सुवासिनीने मागे मागे सरकत या गृहलक्ष्मीचे स्वागत करीत तीला देवघरातील देवांपर्यंत घेऊन यावे व नंतर नवरा नवरीस देवांच्या पाया पडण्यास सांगावे. अशाप्रकारे हा गृहप्रवेश/घरभरवणीचा विधी संपन्न करावा.

तद्नंतर नवरा नवरीस पाटावर बसवून त्यांची घरातील जेष्ठ स्त्रियांकडून दृष्ट काढण्याचा विधी केला जातो व त्यानंतर या नवरा नवरीचा ताबा घरातील स्त्रिया/करवल्या घेतात. त्यावेळी नवरीस नाव घेण्याचा अट्टाहास केला जातो. खेड्यात/गावाकडे पूर्वी एक मजेशीर व कठीण प्रसंगातून या नववधूला जायला लागायचे. ते म्हणजे या नववधूस जेवण करण्याचा अनुभव कितीसा आहे हे आजमवण्यासाठी तिला तीन ते चार शेराच्या मातीच्या मडक्यात शिजत असलेल्या भाताची वाळण लावण्यास सांगण्यात येत असे. वाळण लावणे म्हणजे मडकीतील शिजलेला भाताची पेज काढण्यासाठी ती मडकी उचलून डोण्यावर ठेवून एका विशिष्ट पध्दतीने त्या मडकीचे तोंड एका लाकडी झाकणीने (वाळमांड म्हणत त्या झाकणीस) बंद करुन ती मडकी त्या डोण्यावर(लाकडाचे लांबट आकाराचे आयताकृती भांडे) उलटी करुन ठेवावी लागे की, जेणेकरुन मडकीतील पेज गाळून डोण्यात जमा व्हावी. हे काम फारच जिकीरीचे व कौशल्याचे असल्यामुळे ते यशस्वीपणे पार पडल्यावर नववधूच्या स्वयंपाकातील नैपुण्याची पावती देऊन तिचे कौतुक होत असे. आता अर्थात शहरात अशाप्रकारच्या जीवघेण्या खेळातून नववधूस जावे लागत नाही. कारण जेवण करता आले नाही तर बाहेर पावला पावलावर हॉटेल्स असतातच. त्यानंतर गंमत म्हणून नवऱ्याकडील करवल्या व काही ज्येष्ठ स्त्रीया मिळून नवऱ्याच्या तोंडात विडा देऊन तो तोडण्यास सांगणे,

हळदीच्या पाण्यात पैसे ठेवून ते त्यांना शोधण्यास सांगणे इत्यादी इत्यादी खेळाचे विविध प्रकार नवरा नवरीस खेळाण्यास सांगितले जात. अशाप्रकारे हे सर्व जीवघेणे खेळ संपल्यावर बिचारे नवरा नवरी या करवल्यांच्या घेरावातून सुटायचे. उद्देश एकच की नवरा नवरीने एकमेकांशी निर्भिडपणे जवळीक साधावी. आता तर काय आधीच त्यांची जवळीक झालेली असते.

दुसऱ्या दिवशी सकाळी हातातील कंकणे (हळकूंड दोऱ्यात बांधून ते लग्नविधीत होमाच्यावेळी नवरा नवरीच्या हातात बांधतात त्यास कंकणे असे म्हणतात.) सोडण्याचा कार्यक्रम असतो. नवरा-नवरीने एकमेकांच्या हातातील कंकणे फक्त त्यांच्या उजव्या हाताचा उपयोग करुन सोडायची असतात. तो विधी झाल्यावर नवरा-नवरीस जवळच्या मुख्य देवीच्या/देवाच्या देवळात देवाच्या पाया पडण्यास पाठवितात. घरी आल्यावर नवरा-नवरीची हळद उतरविण्याचा विधी असतो. त्या विधीत सुवासिनींनी नवऱ्याची व नवरीची हळद डोक्याकडून पायाकडे अशी उतरावयाची व त्यानंतर त्यांना मधुचंद्रासाठी मोकळ सोडायचे. त्यांची सोडलेली बाशिंगे किंवा मुंडावळ्या या सासरच्या (नवऱ्याच्या) गावाकडील घरात उंचावर बांधून ठेवण्याची प्रथा आहे. सर्वसाधारणत: ती गावाकडच्या घराच्या छपराच्या मोराळ्यास बांधण्याची प्रथा आहे. आता लग्नसोहळा आटोपला की दुसऱ्याच दिवशी नवरा नवरी मधुचंद्रास जाण्यासाठी निघतात. पूर्वी अशी प्रथा होती की, लग्नानंतर वधुची पहिली मासिक पाळी येईपर्यंत नवरा-नवरीचा संबंध येण्यास परवानगी नसायची. प्रथम मासिक पाळीनंतर मात्र अगदी समारंभाने त्यांना एकत्र येण्याची परवानगी मिळे. त्या विधीस '' फळये शोभान '' असे म्हणत.

## ६) पाच परतावन :-

अशाप्रकारे लग्नविधी संपन्न झाल्यावर सर्वसाधारणतः पाच दिवसानंतर विधीवत वराकडील मंडळींना वधुपित्याने आपल्या घरी जेवणासाठी आमंत्रित करावयाचे. त्यास **पाच परतावन** असे म्हणतात. यासाठी वधुकडील मंडळीनी नव वधू-वरांस व त्यांच्याकडील आप्तेष्टांना आणण्यासाठी वराच्या घरी जावयाचे असते. जातेवेळी पाच नारळांची ओटी व मिठाई घेऊन जावी. ही ओटी वराकडील लोकांनी त्यांच्या देवाजवळ ठेवावी. नंतर या ओटीतील एक नारळ स्वत:कडे ठेवून वराच्या घरच्यांनी आपल्याकडील एक नारळ त्या ओटीत ठेवावा व आपल्याकडील मिठाई त्यात ठेवून ही ओटी पुन्हा

नवरीकडील पाहूण्यांबरोबर पाठवायची असते. पाच परतावनास जाताना सासारकडील मंडळींनी वधुची ओटी गृहप्रवेशाच्यावेळी भरलेल्या ओटीनेच भरुन पाठवणी करावी. नववधु अशाप्रकारे पाचपरतावणासाठी वधुच्या माहेरी आल्यावर दारातच एखाद्या सुवासिनीने मीठमोहरी व भाताचे मुटके वधुवरांवर ओवाळून टाकून त्यांच्या पायावर पाणी ओतून नंतरच त्यांना घरात घ्यावे. नंतर त्यांना घरातील देवाजवळ पाटावर बसवून वधुची ओटी काढून ठेवावी व नंतर वधुवरांची दृष्ट काढण्याची प्रथा आहे. त्यानंतर जेवणाचा सांग्रसंगीत कार्यक्रम करुन वधुवर घरी निघण्यापूर्वी वधुच्या वडीलांनी वधुच्या सासरकडील तसेच आपल्याकडील जेष्ठांना वधु-वरांकरवी नारळ देऊन त्या सर्वांना नमस्कार करण्यास सांगावे.

वराची/नवऱ्याची गंमत म्हणून जेवणाच्या दरम्यान त्याचे बुट लपवून नंतर त्याच्याकडून बक्षीस वसूल केल्यावरच त्याला बूट परत करुन मेव्हणा, मेव्हण्या त्याची त्याच्या घरी पाठवण करतात.

अशाप्रकारे संपूर्ण विवाह सोहळ्याचा विधी संपन्न झाल्यावर नव वधू-वर फळये शोभान किंवा मधुचंद्रास जाण्यास मोकळे होतात.

**मधुचंद्र/फळये शोभान :** मधुचंद्र तर आता सर्वश्रुतच आहे. मधुचंद्र म्हणजे लग्नाचे सर्व विधी आटोपल्यावर नव वधुवरांनी सर्व कुटुंबियांच्या सहमतीने कुठेतरी निवांत स्थळी जाऊन वैवाहिक जीवनाचा पूर्णपणे, निर्बंधपणे आस्वाद घेऊन विवाहाच्यावेळी दोघांच्या जीवनाची मारलेली ब्रम्हगाठ अगदी अजून घट्ट करणे. पूर्वीच्या काळातही या नववधुवरांच्या एकत्र येण्यास म ालवणी भाषेत ''फळये शोभान'' म्हणजेच वधु-वरांच्या लग्न संबंधाने त्यांच्या मिलनातून त्यांची वंशवेल बहरावी म्हणून संपन्न होणाऱ्या लग्न विधीतील एक महत्वपूर्ण विधीच होता. यात नववधुची सासरी आल्यावर प्रथम न्हाण येईपर्यंत नवरा नवरीने एकमेकांच्या जवळ येणे निषिध्द असे. प्रथम न्हाण आल्यानंतर नव वधुवरांस सर्व कुटुंबियांच्या साक्षीने समारंपूर्वक एकत्र आणून घरातील त्यांच्या खोलीत नेऊन त्यांच्या वैवाहिक जीवनाच्या मिलनास पाठींबा दिला जाई व त्यांच्या संसारवेलीवर फुले-फळे येण्यासाठी देवाकडे प्रार्थना केली जाई.

**- शुभं भवतु -**

**लग्नासाठी आवश्यक मानपान व इतर सामान**

## अ) वराकडील बाजूसाठी

### (१) मानपान

साड्या व पँटपीसेस : वधुसाठी १ मोठी साडी किंवा शालू (ब्लाऊज, परकर व सँडलसहीत) आणि १ हिरवी साडी.

- वधुच्या आईवडिलांसाठी अनुक्रमे साडी-चोळी (हिस पोटझाकणीची साडी असे म्हणतात.) व शर्ट-पँट पिस
- वराच्या आईसाठी साडी तसेच वडिलांसाठी व वरासाठी पोषाख, उपरणे व टोपी किंवा फेटा
- वधुच्या आजीआजोबांसाठी अनुक्रमे साडी-चोळी व शर्ट पँटपीस (हा मान ऐच्छिक असतो.)
- वधुच्या बहिणीसाठी साडी किंवा ड्रेस मटेरियल(यास रुखवाताचा मान असे म्हणतात.)
- वधुच्या मामा-मामीसाठी अनुक्रमे शर्ट, पँटपीस व साडीचोळी (या मानास मावळेवसाचा म्हणजेच मामाच्या वंशाचा मान असे म्हणतात.)
- वधुच्या बंधुसाठी शर्ट, पँटपीस (यास कानपिळीचा मान असे म्हणतात.)
- सुवासिनींची ओटी भरण्यासाठी १० ते १५ नारळ, खण/ ब्लाऊजपीसेस्, तांदूळ.
- घरातील सख्ख्या, चुलत बंधुभगिनी, काका काकी, आत्या, मावश्या, आई वडिलांसाठी व इतर नातेवाईकांसाठी योग्य त्या मानाच्या साड्या, शर्ट पँटपीस इत्यादी. (हा मान ऐच्छिक असतो तर बाकीचे मान हे आवश्यक असतात.)

**दागिने :** वधुसाठी मंगळसूत्र. त्याचप्रमाणे मुहूर्तमणी असलेले छोटेसे मंगळसूत्र याचा खर्च वधुवर दोन्हीं पक्षांकडून अर्धा अर्धा करावा असा संकेत आहे.

**(२) लग्नविधीसाठी सामान :** बाशिंग जोड, मुंडावळी जोड व कऱ्हाचा नारळ, तांब्याचा कऱ्हा (तांब्याचा गडू), निरांजन, वधुच्या ओटीचे सामान, (हे बाजारात मिळते) त्याबरोबर खण व १ नारळ, ब्रम्हसूत्र (दोऱ्याची गुंडी), समई, खंजीर, वरास वारा घालण्यासाठी पंखा, २५ अख्या सुपाऱ्या, पाच हळकुंडे,

कोरा कपडा १ मीटर, हिरवा खण, अत्तर, १५ ते २० पत्रावळी, दहा द्रोण, येरवण/परडी, निम सांडण्यासाठी काठ्या, मुहूर्त मेढ, कुळाची फांदी, आंब्याचे डहाळे, हळद, पिंजर, गुलाल, रांगोळी, गंधगोळी, जान्हवी जोड, कापूस/वाती, काळे मणी, अगरबत्ती, धूप, कापूर, खोबरे वाटी, साखर, सुशोभित केलेला खंजीर, दरवाजांसाठी फुलांची तोरणे, मुख्य मंडपाच्या दरवाजासाठी अख्या केळीची खांब त्यातील एक खांब हा केळफुलासहित (पोसवलेल्या केळीचा खांब) असावा.

**(ब) वधुकडील बाजुसाठी :-**

**(१) मानपान**

साड्या, पँटपीसेस :-वरमाय व वडिलांसाठी अनुक्रमे साडी व पँटपीस वरासाठी पोशाख(सूट पॅट, शर्ट, बूट इ.)

- वराच्या बहिणीसाठी साडी-चोळी किंवा ड्रेस मटेरियल(यास इंगळाचा मान असे म्हणतात. कारण वराची बहीण लग्नातील होमासाठी जो अग्नी/निखारे आणते हे निखारे म्हणजेच इंगळे)
- घरातील सख्ख्या, चुलत नातेवाईंकांसाठी साडी-चोळी, पँटपीस(हा मानपान ऐच्छिक असतो.)
- वधुच्या आईसाठी व वधुसाठी शाल व वडीलांसाठी उपरणे, टोपी.

**(क) (१) दागदागिने :** वधुवरांच्या अंगावर रिती-रीवाजाप्रमाणे घालावयाच्या दागिन्यांव्यतिरिक्त दागिने घालणे हे ऐच्छिक असते. ते वधु वरांकडील मंडळींच्या इच्छेवर त्याचप्रमाणे संमजसपणावर अवलंबून असते. मात्र लग्नातील मंगळसूत्र हे वराकडील मंडळीनीच करायचे असते. पण त्या मंगळसूत्रातील दोन वाट्या व चार मण्यांपैकी एक वाटी व दोन मण्यांचा खर्च हा वधूकडील मंडळींनी करायचा असतो. त्याप्रमाणे वधुकडील मंडळींनी वधूस घालावयाची नथ, बुगड्या, कुडी आणि चांदीची वेडणे, पैंजण(हे ऐच्छिक), कुंकवाचा करंडा व फणी हे दागिने देणे बंधनकारक असते. कारण वधुपित्याने आपल्या कन्येचे सालंकृत कन्यादान करावे असा संकेत आहे.

**(२) कन्यादानाची** वधुपित्याने आपल्या कन्येच्या संसारास सुरुवातीस आवश्यक ती भांडी

**भांडी :-** म्हणजेच ताट, तांबे, हंडा, कळशी, तांब्याचा कलश (गडू तांब्या व फूलपात्र) समई इत्यादी कन्यादानाच्या सोहळ्याच्यावेळी ज्यावेळी

ब्राम्हण घटीका पात्रातील पाणी वधुच्या आईवडीलांच्या ओंजळीतून वधुच्या व त्याच्या खाली ओंजळ असलेल्या वराच्या व त्याच्या आई-वडीलांच्या ओंजळीत सोडत असतो. त्यावेळी देण्यासाठी म्हणून या भांड्यास **कन्यादानाची भांडी** किंवा घटिका पात्रातील पाण्याची धार सोडताना घ्यायची म्हणून यास **धारेची भांडी** असेही म्हणतात.

***टीप :***

*वधुसाठी एक बॅग/सुटकेस, तिच्या साड्या, कपडे व आवश्यक सामान सासरी नेण्यासाठी वधु पित्याने द्यायची असते.*

**(२) लग्न विधीसाठी सामान :** मुंडावळ्या, कऱ्ह्याचा नारळ, तांब्याचा कऱ्हा (गडू तांब्या) निरांजन, वधुसाठी खणानारळाची ओटी, अक्षता, हळद, पिंजर, गुलाल, रांगोळी, १५ पत्रावळी, दहा द्रोण, खोबरे वाटी, गुळ, हिरवा खण, कोरा रुमाल, येरवण/परडी, समई, ब्राम्हसूत्र (सुतगुंडी), अक्षता, २५ अखब्या सुपाऱ्या, पाच हळकुंडे, निमाच्या काठ्या, मुर्हूतमेढ, कुळाची फांदी, आंब्याचे डहाळे, धूप, कापूर, अगरबत्ती, होमपुडी, समिधा, चंदन भुसा, भाताच्या लाह्या, होमाची माती, होमकुंड (हे मंगल कार्याच्या ठिकाणी उपलब्ध असते), मध, सहाण, अंतरपाट, पिवळा, रुमाल, अत्तर, कापूस/वाती, साखर, पेढे, गुलाबपाणी, दरवाजांसाठी तोरणे, मुख्य मंडपाच्या दरवाजासाठी केळीचे दोन खांबांपैकी एक केळफूलासहीत असावा. रुखवत (मिठाई) त्याचप्रम ाणे आपल्या आवडी प्रमाणे निरनिराळ्या बनविलेल्या वस्तुंनी तयार केलेले लग्नमंडपात मांडण्यासाठी रुखवत.

**लग्नाचे देवक बसविण्यासाठी व लग्न विधीसाठी वर-वधु पक्षांसाठी सामूहीक साहित्य -** तीन गडू तांबे, दोन ताम्हणं, समई, निरांजन, पळी-पंचपात्र, पाच पाट, पाटावर अंथरण्यासाठी चादर, मुसळ, चार ताटे, सुटी फुले, दुर्वा, तुळस, पाच आंब्याचे डहाळे, ४ किला तांदूळ, पन्नास देठी पाने, ३०-३५ सुपाऱ्या, ३०-३५ नारळ, वाटीभर तूप, वधुवरासाठी मोठे हार, पुष्पगुच्छ.

***टीप :***

*१) वरील लग्नविधीसाठी लागणारे सर्व सामान हे बाजारात तयार मिळते याची नोंद घ्यावी. फक्त भांडी, पाट, चादरी वगैरे आपापले आपण आणावयाचे असते.*

*२) अलीकडे लग्न हे मंगल कार्यालयात होते व लग्न सामान, जेवण इत्यादीचे कंत्राट दिले जाते*

त्यामुळे लग्नविधीचे वर व वधुकडील सर्व सामान हे कंत्राटदाराच

आणत असतो. फक्त वधु-वरांच्या घराकडील मंडपास किंवा इमारतीच्या दरवाजास बांधण्यासाठी आंब्याचे डहाळ, फुलांची तोरणे व केळीचे खांब ज्यांनी त्यांनी स्वतंत्र आणणे आवश्यक असते.

**गरोदरपणातील व बाळंतपणानंतरचे विधी :**

**(अ) गरोदरपणातील विधी :-**

**चोर ओटी** - सूनबाई किंवा कन्या गरोदर राहिल्यास तिला तिसरा महिना लागला की त्याच्या आनंदाप्रित्यर्थ फक्त दोन्हीं घरातील मंडळीच (सासर व माहेर) तिची ओटी भरण्याचा विधी करतात. उद्देश हाच की बाहेरच्या मंडळीत त्याची वाच्यता होवू नये.

या विधीत गरोदर स्त्रीच्या उदरी येणारे बाळ हे कृष्णाचे रुप मानून त्या स्त्रीस दह्याच्या शिंक्याखाली बसवितात. नंतर ती स्त्री आपल्या आईच्या कानात आपणांस दिवस राहिल्याचे सांगाते. म्हणजेच आपण गरोदर असल्याचे जाहिर करते. त्यानंतर ती आजी आपल्या येणाऱ्या नातवंडाच्या खुशीत आपल्या जाऊबाई किंवा इतर कोणाकडून तरी आपल्या गरोदर मुलीची ओटी भरते. (कारण आईने आपल्या मुलीची ओटी भरु नये असा संकेत आहे.) ओटी भरण्याचा विधी झाल्यावर तिच्या डोक्यावरील शिंक्यातील दही गरोदर स्त्रीच्या तोंडात पडेल अशाप्रकारे शिंके हलवितात. हा एक छोटेखानी विधी असतो की ज्यात आपल्या वंशवेलीवर येणाऱ्या फुलाची जाणीव आपल्या कुटुंबातील सर्वांना जाहिरपणे करुन देण्यात येते.

**डोहाळ जेवण** - गरोदर स्त्रीस सात महिने झाल्यावर सर्व कुटुंबात व नातेवाईकांत, मित्रपरिवारात जाहीरपणे एक विधी केला जातो. यात गरोदर स्त्रीची ओटी भरणे व तिला निरनिराळे पदार्थ खाण्यास देण्याची व निरनिराळे खेळ खेळण्याची पध्दत आहे. या विधीत गरोदर स्त्रीला हिरवा शालु/साडी नेसवून फुळाफुलांनी तिची वाडी भरतात व नंतर फुलांनी सजविलेल्या आसनावर किंवा झोपाळ्यावर तिला बसवितात व तिची निमंत्रितांकडून ओटी भरण्यात येते. त्यांनी आणलेले निरनिराळे पदार्थ तिला खाण्याचा आग्रह करण्यात येतो. ओटी भरुन झाल्यावर येणारे बाळ कोण मुलगा की मुलगी आहे याचा अंदाज करण्यासाठी गरोदर स्त्रीची, नणंद व बहीण गुपचुपपणे एका ताटात बर्फी व पेढे वेगवेगळ्या वाटीखाली झाकून ते ताट तिच्यासमोर धरतात व तिला त्या दोन वाट्यांपैकी एक वाटी उचलायला सांगतात व जर पेढ्यावरील वाटी उचलली तर येणारे बाळ

मुलगा व बर्फीवरील वाटी उचलली तर मुलगी असण्याचा अंदाज वर्तविण्यात येतो व आनंदाने जल्लोष करण्यात येतो. नंतर चहापाण्याच्या कार्यक्रम होऊन डोहाळ जेवणाचा विधी संपन्न होतो.

## (ब) बाळंतपणानंतरचे विधी :-

**पाचवी –** बाळ जन्मल्यानंतरचा पहिला विधी म्हणजे त्याच्या जन्म ाच्या पाचव्या दिवशी संध्याकाळी करायचा विधी की ज्याला ''पाचवी'' असे म्हणतात. जन्माच्या पाचव्या दिवशी सटवी देवी येऊन मुलाचे भविष्य लिहून जाते असा समज आहे. म्हणून तिच्या आगमनासाठी हा विधी केला जातो.

सामान्यपणे पाचव्या दिवशी करायचा हा विधी काही कारणामुळे म्हणजेच सुतिकागृहातून पाचव्या दिवशी घरी येऊ न शकल्यामुळे किंवा बाळाच्या आईची तब्येत बरी नसल्यास साग्रसंगीत करता येणे शक्य नसल्यास सटवी देवीच्या नावाने ओटी काढून ठेवतात व नंतर ती मुलाला आंघोळ घालणाऱ्या बाईस मानाने देतात.

तरी सर्वसाधारणपणे रुढींप्रमाणे हा विधी पार पाडण्यासाठी बाजारात बालकाच्या पाचवीसाठीचे सामान मिळते ते आणावे किंवा गावाकडे जंगलातून जमा करावे. या समानात मुख्यत: बांबू, लाल पेंडकूळणीची फुले, काजऱ्याच्या झाडाच्या छोटया काठ्या, नरवेलाची पाने, आंब्याचा टाळ, बाळगुटी इत्यादी साहित्याचा समावेश असतो. त्याचप्रमाणे यासाठी आक्याची (बांबूच्या वर्तुळाकार केलेल्या काठीला दोऱ्याचे जाळे बांधून त्याचा शंकूकृती तयार केलेला भाग) सुध्दा आवश्यकता असते. त्याचप्रमाणे केरसुणीच्या हिरांच्या तयार केलेल्या छोट्या छोट्या धनुकल्या(छोटी धनुष्ये) सर्वसाधारणपणे २०/२५ बनवाव्यात. नंतर आक्याचे वरचे टोक बाळंतीणीच्या खोलीत ज्या ठिकाणी सटवीची पूजा करायची असेल त्या ठिकाणी (आकृतीत दाखविल्याप्रमाणे) (परिशिष्ट पहावे) टांगावे व खालील वर्तुळाकार भागाला तयार केलेल्या धनुकल्या वर्तुळाकार लोंबत्या बांधून धनुकल्यांच्या एका टोकास पेंडकुळणींची फुले व दुसऱ्या टोकास काजऱ्याचा पाला बांधून झुंबर करावे व त्याच्याखाली पाटावर सुपात तांदूळ घेऊन त्यात तांब्याच्या गडूचा घट ठेवावा (घट तयार करण्यासाठी तांब्याच्या गडू, ताब्यांत ३/४ भागापर्यंत पाणी, त्यात एक फुल व नाणे टाकावे, त्याच्या तोंडावर पाच पानांचा आंब्याचा टाळ ठेवून वर एक नारळ ठेवावा) त्याच्या बाजूस केळीच्या पानाचा शंकूच्या आकाराचा खोला ठेवून त्यास नथ अडकवावी, मंगळसूत्र घालून हळदकुंकू लावून

सटवीची प्रतिमा तयार करावी आणि बाळाच्या बाळगुटीची डबी त्याचप्रमाणे बाळास घालायची सटवीची सोन्याची मुद्रा ठेवावी अशी पाटावर मांडणी करुन झाल्यावर निरांजन/समई लावून सटवीची साग्रसंगीत पूजा करावी. तत्पूर्वी काजऱ्याच्या काड्या व नरवेलाच्या पानांचे जुडगे करुन बाळंतीणीच्या खोलीत चारही कोपऱ्यात व दरवाज्यावर टांगावेत. फुला, पानांनी तयार केलेल्या धनुकल्यांपैकी एक धनुकली बाळाच्या उशाशी, एक पायाशी व बाळंतीणीच्या खोलीच्या चार कोपऱ्यात चार ठेवण्याची प्रथा आहे. याच पाचवीच्या मांडणीजवळच एका पाटावर कोरी वही व पेन्सिल/पेन ठेवावे की जिच्यावर रात्री सटवी देवी येऊन बाळाचे भविष्य लिहून ठेवू शकेल असा संकेत आहे.

त्यानंतर सटवी देवीची पूजा झाल्यावर नैवेद्य दाखवावा. नैवेद्यात वरणभात, प्रामुख्याने शेवग्याची भाजी, काळ्या वाटण्याचे सांबारे व कुळदाच्या घुगऱ्यांचा समावेश असावा. (कुळदाच्या घुगऱ्या म्हणजे उकडलेले कुळीथ) त्याचप्रमाणे एक तांदळाची भाकरी तीत थोडा नरवेलाचा पाला टाकून खास बाळंतीणीसाठी भाजावी आणि तिला खास खायला द्यावी.(नरवेलाच्या पाल्यात रोग प्रतिकारक शक्ती वाढविण्याचा गुणधर्म असतो.) ज्येष्ठ व्यक्तिने सटवीकडे बाळास सुदृढ व चांगले आरोग्य लाभावे म्हणून गाऱ्हाणे करावे.

***टीप :–***

१) *सर्वसाधारणपणे पहिले बाळंतपण माहेरीच होत असल्यामुळे सासरच्या मंडळीनी खारीक, बदाम, सुपारी, हळकूंड प्रत्येकी पाच, नारळ व तांदूळ यांची ओटी सटवी पूजनासाठी आणावी व सासरच्या मंडळीनी ओटी भरल्यानंतर माहेरच्या लोकांनी तांदुळ–नारळाने सटवीची ओटी भरावी.*

२) *पूजा झाल्यानंतर बाळाच्या हाताच्या मनगटात व पायात काळा दोरा बांधावा व गळ्यात पुजेसाठी ठेवलेली सोन्याच्या सटवीची प्रतिमा काळ्या दोऱ्यात ओवून बांधावी. (सटवीची प्रतिमा प्रामुख्याने गळ्यातच बांधावी. मनगटात बांधली तर बाळ हाताची बोटे चोखताना सटवीची प्रतिमा सुटून बाळाच्या तोंडात जाण्याची शक्यता असते.)*

३) *नैवेद्यात शेवग्याच्या पानांची भाजी ठेवण्याचा उद्देश की, बाळंतीणीला कॅल्यशियम मिळावे. नरवेलाच्या पानांमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढावी हाच बहुदा उद्देश असावा.*

अशाप्रकारे पाचवीचा विधी संपन्न झाल्यानंतर संपूर्ण रात्रभर निरांजन/समईतील ज्योत सांभाळावी. नंतर पहाटेच घरच्या ज्येष्ठ व्यक्तीने किंवा बाळंतीणीला तेल लावणाऱ्या बाईने पाचवीच्या मांडणीतील मौल्यवान वस्तुंखेरीज सर्व

साहित्य जमा करुन घेऊन जायचे असते. यालाच पाचवी पळविण्याचा विधी असे म्हणतात. जर पाचवी घरातील ज्येष्ठांनी पळविली असेल तर त्या व्यक्तीने त्या दिवशी घरी येऊ नये असा संकेत आहे.

येथे एक नमुद करावेसे वाटते की, काही गावातील पाचवी ही रात्रभर थाळी वाजवून जागवायची प्रथा आहे. त्यात जर बाळ मुलगी असेल तर बाईच्या जोडव्यांनी थाळी वाजवून किंवा मुलगा असेल तर घंटानाद करीत किंवा चम च्याने थाळी वाजवित पाचवीची रात्र जागवली जाते.

उपरोक्त सर्व सोपास्कार हे शहरात शक्य होत नाहीत म्हणून एक सोपा उपाय म्हणून एकतर या पाचवीच्या दिवशी सटवीच्या नावाने ओटी काढून ठेवावी किंवा वर उल्लेखिलेल्या आके, धनुकल्या यांची सजावट न करता फक्त इतर विधी करण्यास गुरुजी संमती देतात की, जेणेकरुन हिंदु धर्मसंस्काराची पूर्तता होते.

**पाचवीसाठी लागणारे साहित्य :** पेंडकूळणीची फुले, काजऱ्याचा पाला व काटकुळ्या, नरवेलीची पाने, निवडूंगाची फांदी, सटवीची प्रतिमा(बाळासाठी आणलेली सटवीची प्रतिमा), विड्याची पाने, सुपाऱ्या, तांदुळ, सूप, आंब्याचे टाळ, नथ, मंगळसूत्र, केळीची पाने, बाळगुटी, काळादोरा, आके, धनुकल्या करण्यासाठी बांबूच्या छोट्या लवचिक काड्या किंवा केरसुणीचे हीर, पाच/ दहा नारळ, तांब्याचा गडू, पाटी-पेन्सिल किंवा वही पेन्सिल, पूजेसाठी फुले, हळदकुंकू, रांगोळी इत्यादी.(शहरात सर्व साधारणपणे पाचवीचे सर्व साहित्य बाजारात विकत मिळते.)

**कान टोचणे** - नवजात बालकाचे कान टोचणे हा हिंदुधर्मातील एक महत्वाचा संस्कार आहे. बालकाचे कान टोचण्याचा विधी हा सर्वसाधारणपणे त्याच्या जन्माच्या बाराव्या किंवा सोळाव्या दिवशी करतात. तो सोनाराकरवी करवून घेतात. यासाठी सोनारास सोन्याच्या मुद्या(सोन्याच्या तारांच्या रिंगा) घेऊन आपल्या घरी येण्याचे आमंत्रण देतात. त्याला पाटावर पूर्वेकडे तोंड करुन बसण्यास सांगून बाळाला त्याच्या मांडीवर देतात. नंतर सोनार बाळ मुलगा असेल तर प्रथम उजवा व मुलगी असेल तर डावा कान टोचून दोन्हीं कानात मुद्या घालतो. त्यावेळी होणाऱ्या वेदनांनी बाळ रडते. त्याचे रडणे थांबविण्यासाठी त्याला मध अथवा साखर चाखवतात. कान टोचल्या ठिकाणी डेटॉल/सॅव्हेलॉन हे अँटीसेप्टीक लावावे. ते उपलब्ध नसेल तर तुळशीच्या पानांचा रस लावावा. पुढे

दोन ते तीन दिवस ते कानाला लावून कान टोचलेल्या भागाची काळजी घ्यावी.

***टीप :–***

*कान टोचणे ही आपल्या हिंदुधर्माची प्रथा असली तरी त्यामागील शास्त्रीय कारण म्हणजे हे एक प्रकारचे ॲक्युपंक्चर असते. त्यामुळे बाळाच्या स्मरणशक्तीची वाढ होण्यास त्याचप्रमाणे त्यांची रोग प्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.*

**बारसे/नामकरण विधी :**

ज्यावेळी बाळ जन्मते त्यावेळी ते निष्पाप बालक असते. त्याचा धर्म निश्चित नसतो. बाळास त्याच्या आईवडिलांच्या धर्माचे संस्कार करुन त्या धर्मात सामावून घेण्याचा जो विधी असतो त्यास बारसे करणे किंवा नामकरण विधी असे म्हणतात.

हिंदु धर्मात हा विधी जर बाळ बाळंतीणीची प्रकृती व्यवस्थित असेल तर बाळाच्या जन्मदिवसापासून बाराव्या किंवा सोळाव्या दिवशी करतात. यासाठी मुहूर्ताची आवश्यकता नसते. अन्यथा बाळ-बाळंतीणीची तब्येत ठीक ठाक झाल्यावर एखादा शुभ मुर्हूत पाहून साजरा करतात.

या विधीच्या दिवशी बाळाला पाळण्यात घालण्याचा, बाळंतीणीची ओटी भरणे व तिला पाणवठ्याला स्पर्श करण्यास लावून नंतर घरातील सर्व कामे करण्यास मोकळीक होते.

**बारशाचा विधी –** या दिवशी विधीला सुरुवात करण्यापूर्वी प्रथम बाळाच्या म्हणजेच त्याच्या वडीलांच्या घरच्या व आजोबांच्या (बाळंतीणीच्या माहेरच्या देवास)देवास नारळ ठेवून गाऱ्हाणे करावे. नंतर बाळासाठी फुलांनी सजविलेले पाळणे बाळाचे डोके दक्षिणेकडे येईल अशाप्रकारे ठेवावे. त्या पाळण्याच्या चारही पायांजवळ चार व पाळण्याखाली एक असे वीडे ठेवावेत. त्याचप्रमाणे त्या प्रत्येक विड्यावर पाच प्रकारची धान्ये( भात किंवा गहू, उडीद, मूग, चणे, गहू इ.) आणि पेढा ठेवावा.

पाळण्याची मांडणी झाल्यावर प्रथम बाळंतिणीला पाळण्याजवळ पूर्वे कडे तोंड करुन पाटावर बसवावे. त्यानंतर प्रथम तिच्या माहेरुन आणलेली ओटी(५ नारळ, ५ फळे, ५-५ खारी-बदाम त्याचप्रमाणे इतर ओटीचे सामान जे बाजारात आयते मिळते ते आणि खणासहीत) भरावी. नंतर तशीच ओटी सासरकडून भरावी आणि त्याबरोबर ओटीत बाळंतविडा (बाळाचे आंगडे-टोपडे, त्याच्यासाठी तयार केलेली दुलयी म्हणजेच मऊशार गोधडी, लंगोट

इत्यादी साहित्यास बाळंतविडा म्हणतात.) ठेवावा. हे सर्व झाल्यावर बाळाला बाळंतीणीच्या ओटीत घालावे. बाळंतीणीने त्यानंतर घरातील देवाला व जेष्ठांना नमस्कार करावा. घरच्या ओट्या भरण्याचा विधी आटोपल्यावर इतर उपस्थित सुवासिनींनी बाळंतीणीची ओटी भरावी.

हा सर्व विधी आटोपल्यावर मुख्य कार्यक्रमास म्हणजे बाळाला पाळण्यात घालणे व त्याचे नामकरण करण्याच्या विधीस सुरुवात करावी. यासाठी दोन सुवासिनींनी पाळण्याच्या दोन बाजूस उभे रहावे व प्रथम एका सुवासिनीने तळी तयार करुन (तळी म्हणजे ताम्हाणात निरांजन पेटवून घेऊन त्यात पानाचा वीडा म्हणजे खायची पाने दोन त्यावर एक रुपयाचे नाणे व त्यावर सुपारी ठेवावी.) ती पाच वेळा पाळण्याखालून समोरच्या सुवासिनीकडे द्यावी. ती तिने पाळण्यात ठेवून पुन्हा समोरच्या सुवासिनीकडे पाळण्याखालून द्यावी. ती तिने पाळण्यात ठेवून पुन्हा समोरच्या सुवासिनीकडे द्यावी. अशाप्रकारे पाचवेळा करुन नंतर बाळंतवीडा अशाप्रकारेच पुन्हा पाच वेळा पाळण्याखालून काढून नंतर पाळण्यात ठेवावा.

हे सर्व झाल्यानंतर एक गोल किंवा लांबट दगड किंवा पाट्याचा वरवंटा घेऊन त्याला हळदीच्या पाण्यात भिजवलेला पांढरा कपडा गुंडाळावा व एखादी सोन्याची चेन (असल्यास) गुंडाळून तो सुध्दा वरीलप्रमाणेच पाचवेळा पाळण्याखालून काढावा व शेवटी पाळण्यात बाळाच्या डोक्याकडील भागात ठेवावा. या सजविलेल्या दगडास ‘ बाळू ’ असे म्हणतात. त्याला नंतर सांगणे करावे की तुझ्यासारखेच आमच्या बाळाला दणकट कर व आजपासून तू त्याचे संरक्षण कर.

बाळूची पाळण्यात स्थापना झाल्यावर जमलेल्या इतर सर्व सुवासिनींनी पाळण्याभोवती उभे रहावे व पूर्वीच्या सुवासिनींनी बाळाला वरीलप्रमाणेच पाचवेळा पाळण्याखालून काढावे व नंतर त्याला पाळण्यात ठेवावे. बाळाला पेढा किंवा साखर चाखवावी. यावेळी सर्वसाधारणत: बाळाच्या आत्याने किंवा इतर कोणीही बाळाला त्याचे नाव त्याच्या कानात सांगावे व नंतर इतरांना मोठ्याने सांगावे व पाळण्याला झोका द्यावा व ‘ पाळणा ’ (म्हणजेच पाळण्यात घालताना म्हणायची गाणी) म्हणावा. नंतर देवास गाऱ्हाणे करुन एक नारळ वाढवावा(फोडावा) व त्याची शिरवणी म्हणजेच खिरापत करावी.

अशाप्रकारे नामकरण विधी संपन्न झाल्यावर ओटीसह बाळंतीणीला पाळण्याच्या चार पायांकडील व खाली ठेवलेले धान्य एकत्रित करुन एका तळीत घेण्यास सांगावे व तळी घेऊन तिला विहीरीवर किंवा पाण्याच्या नळाजवळ

किंवा आता फ्लॅट संस्कृतीमुळे घरातील बाथरुममध्ये आणावे, विहीरीची किंवा नळाची (नळाचे पाणी सोडून) विधीवत पूजा करावी. गावी असल्यास विहीरीच्या काठाजवळील जमिनीत किंवा शहरात असल्यास एका प्लास्टिकच्या डब्यात माती घेऊन ते धान्य त्यात पेरावे व पाणी घालून ते रुजवण वाढवावे व वाढल्यावर गाईस द्यावे. तळीतील विडा तिथेच ठेवून विहीरीचे किंवा नळाचे पाणी बाळंतीणीकरवी एखाद्या तांब्यातून घरी घेऊन यावे. अशाप्रकारे बाळंतीणीला पाणवठयाचा स्पर्श करुन घरातील इतर सर्व कामे करण्यास मोकळीक करावी. कारण तोपर्यंत बाळंतीण ही सोयर असल्यामुळे तिला अशौच असते असे संकेत आहेत.

वरील सर्व विधी यथावत पार पडल्यावर जमलेल्या मंडळींना बाळ मुलगा असेल तर पेढे किंवा मुलगी असेल तर बर्फी व वर उल्लेख केल्याप्रमाणे तयार केलेली नारळाची खिरापत देऊन बाळाचे नाव सांगून त्यांची तोंडे गोड करावीत. सुवासिनींना नारळ, पेढे व भिजवलेले चणे (यालाच घुगऱ्या असे म्हणतात.) देऊन त्यांनी आणलेल्या ओटीचा मान त्यांना द्यावा. या घुगऱ्यावरुनच एक म्हण प्रचलित आहे की, ''अरे मी तुझ्या बारशाच्या घुगऱ्या खाल्ल्या आहेस'' म्हणजे मी तुला अगदी लहानपणापासून ओळखतोय.

अशाप्रकारे बारसे/नामकरण विधी संपन्न झाल्यावर त्या बाळास खऱ्या अर्थाने त्याच्या आई-वडीलांच्या धर्मात प्रवेश मिळतो. त्यानंतर बाळास व त्याच्या आईस सव्वा महिन्यानंतर आपल्या सोईनुसार स्थानिक देवतेच्या देवळात घेऊन जावे व त्यांच्या भावी आयुष्यासाठी कृपाशिर्वाद घ्यावेत.

**जायवळ :** या विधीला जावळ असेही म्हणतात. बाळ सव्वा वर्षाचे झाल्यावर न्हाव्याकडून त्याचे बालपणीचे केस काढण्याचा हा विधी. यासाठी न्हाव्यास घरी बोलावून घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीने बाळास मांडीवर घेऊन बसावे व न्हाव्याकरवी त्याचे केस कापून घ्यावेत. बाळास गरम पाण्याने आंघोळ घालावी व न्हाव्यास यथाशक्ती शिधा व दान द्यावे. कापलेले केस गोळा करुन ते एकाद्या झाडाच्या मुळात किंवा तीर्थावर सोडावेत. पूर्वी व आत्ताही काही काही कुटुंबात लहानपणीचे सर्व केस काढून बाळाचा चकोट करण्याची प्रथा होती. पण आता फक्त केसांचे आपापल्या आवडीप्रमाणे सेटींग करुन घेतात. असो. जर चकोट केला असेल तर त्यावर चंदन किंवा दुधाची साय लावून बाळास आंघोळ घालावी.

पूर्वी बाळाचे जायवळ करताना बाळाच्या मागे एकादी सुवासिनी तळी

घेऊन उभी राहत असे व बाळाचा मामा त्याच्या डोक्यावर छत्री उघडून घेत असे व न्हाव्याकडून जायवळ काढण्याचा विधी पूर्ण झाल्यावर त्या छत्रीवरुन लाडू टाकण्यात येत असत. जमलेली मंडळी ते लाडू उचलून खात असत.

**मौजीबंधन/उपनयन :** हा विधी म्हणजेच मुंज करणे. परंतु हा विधी प्रामुख्याने ब्राम्हण समाजातच केला जातो. म्हणून त्याचा उहापोह येथे केलेला नाही.

**वाढदिवस :** बाळाच्या जन्मास वर्ष झाल्यानंतर त्याचा प्रथम वाढदिवस करण्यात येतो. सर्वसाधारणपणे अलीकडे पहिला वाढदिवस अगदी धुमधडाक्यात साजरा केला जातो. त्यानंतर मात्र पुढे आयुष्याच्या विशिष्ट वळणावर वैशिष्टयपूर्ण वाढदिवस साजरा करण्याची पध्दत असून त्या वाढदिवसांना वर्षाच्या संख्येप्रम ाणे विशिष्ट नावेही देण्यात येतात. जसे

| | | |
|---|---|---|
| पंचवीसावा वाढदिवस | - सिल्व्हर ज्युबिली | - रजत जयंती |
| पन्नासावा वाढदिवस | - गोल्डन ज्युबिली | - सुवर्ण जयंती |
| साठावा वाढदिवस | - डायमंड ज्युबिली | - हिरक महोत्सव |
| पासष्टावा वाढदिवस | - सफायर ज्युबिली | - निलम महोत्सव |
| पंच्याहत्तरावा वाढदिवस | - प्लॅटिनम ज्युबिली | - अमृत महोत्सव |
| शंभरावा वाढदिवस | - सेंटेनरी ज्युबिली | - शतक महोत्सव |

याव्यतिरिक्त आणखीन एक वाढदिवस साजरा करण्याची पध्दत आहे. तो म्हणजे एक्याऐंशीवा. याला ''सहस्त्रचंद्र दर्शन'' असे म्हणतात. मराठी पंचागाप्रमाणे ८१ वर्ष पूर्ण झाल्यावर ८१ वर्ष X १२ महिने अधिक ८१ वर्षाच्या कालखंडात दर तीन वर्षांनी येणार एक असे २७ अधिक महिने मिळून एकूण ९९९ महिने म्हणजे ९९९ पौर्णिमा येतात. त्यामुळे साधारणत: ८१ वर्ष १ महिन्यात १०००पौर्णिमा हातात. म्हणजेच १००० वेळा (सहस्त्रवेळा) पूर्ण चंद्र पाहण्याचा योग त्या व्यक्तीला येतो. म्हणून अशा व्यक्तीचा ८१ वर्ष १ महिन्यानी सहस्त्रचंद्र दर्शनाचा सोहळा साजरा केला जातो. तो तसा पाहिला तर दुर्मिळच योग असतो.

आपल्याकडे वाढदिवस साजरा करताना बाळाचे किंवा त्या व्यक्तिचे त्या व्यक्तीच्या वर्षाएवढे दिवे लावून तिचे औक्षण करण्याची पध्दत आहे. परंतु हल्ली बहूसंख्य लोक पाश्चात्यांच्या पध्दतीप्रमाणे केक करुन त्या केकवर वर्षाच्या संख्येप्रमाणे एक, दोन, तीन .......... अशा मेणबत्त्या लावून किंवा तेवढ्या अंकाच्या आकाराच्या मिळणाऱ्या आयत्या मेणबत्त्या लावून उत्सवमूर्तीकरवी

त्या फुंकून व नंतर केक कापून वाढदिवस साजरा करतात. आपण मात्र औक्षण करावे अशी माझी आग्रही सूचना आहे. पाश्चात्यांच्या पध्दतीने मेणबत्त्या विझवून आपण गतकाळ विसरुन नव्याचे स्वागत करतो. पण आपल्या पध्दतीत औक्षण करुन वाढदिवसाच्या वर्षांऐवढे दिवे लावून न फुंकता उत्सवमूर्तीला ओवाळण्याची पध्दती आहे म्हणजेच आपण वाढदिवसादिवशी गतकाळास न विसरता त्याची आठवण जागी ठेवून येणाऱ्या नवीन वर्षाचे स्वागत करतो म्हणूनच आपल्याकडे गतकाळाची आठवण आपल्यात सतत तेवत रहाते व कौटुंबिक सौख्य अबाधित रहाते. परंतु पाश्चिमात्यांत मात्र त्याची उणीव प्रकर्षाने जाणवताना दिसते, त्याचेही बहुधा हेच कारण असावे. कारण ते दिवे मालवतात व आपला गतकाळ, कुटुंबियांना विसरतात. तर अशाप्रकारे वाढदिवस साजरा करुन आलेल्या निमंत्रितांना अल्पोपहार, चहापाणी व बाळगोपाळांना एकादी भेटवस्तु देण्याची प्रथा आहे.

**अन्नप्राशन :-** मुलाची पचनशक्ती वाढावी व त्याला त्याच्या भावी आयुष्यात भक्षण कराव्या लागणाऱ्या विविध अन्नपदार्थांच्या चवीचा परिचय व्हावा या उद्देशाने चांदीच्या ताटातून चांदीच्या चमच्याने खीर-भात भरविण्याचा विधी म्हणजे ' अन्नप्राशन विधी ' होय. सर्वसाधारणपणे हा विधी मुल घनपदार्थ खाऊ लागल्यानंतर आठव्या किंवा दहाव्या महिन्यात करतात.

**बोरन्हाणं :-** हा विधी मुलाच्या वयाच्या पहिल्या वर्षकाळात येणाऱ्या मकरसंक्रांतीस किंवा त्यानंतर येणाऱ्या रथसप्तमी(माघ शुध्द सप्तमी) पर्यंतच्या काळात करतात. या विधीसाठी मुलाला तिळाच्या हलव्याचे दागीने घालून सजवतात(हे दागिने हल्ली बाजारात विकत मिळतात.). नंतर मुलाला पाटावर बसवून त्याच्या डोक्यावरुन बोरे, उसाच्या गंडेऱ्या, लाह्या, तीळाचे लाडू, तीळाचा हलवा, चॉकलेटस् वगैरे हलकेच पदार्थ जसे आपण आंघोळीच्यावेळी डोक्यावरुन पाणी ओततो तसे ओतून त्याला या वस्तुंनी न्हाऊ घालतात. खाली पडलेले हे पदार्थ/वस्तु जमलेली लहान मुले आनंदाने जमा करतात व खातात. उद्देश हाच की मुलाला या वस्तुंचा परिचय व्हावा.

**मृत्युनंतरचे संस्कार (अंत्येष्टी) :-** मृत्यू ही सर्वांसाठीच अटळ घटना आहे. या घटनेमुळे मनुष्य देहातून आत्म्याची मुक्ती होत असते. तर त्या मुक्त आत्म्यासासद्गति लाभावी म्हणून आपल्या शास्त्रात विविध विधी सांगितले

आहेत. प्रचलित नियमांनुसार मृत्युनंतर केले जाणारे विधी म्हणजे

१) प्रेत दहन केल्याच्या दुसऱ्या दिवशी जळलेल्या चितेच्या राखेवर मुलगा किंवा ज्या व्यक्तीने अग्नी दिला असेल तिने तुळशी पत्राने गोमुत्र शिंपडावे व त्यानंतर अस्थी गोळा कराव्यात. तेथे दूध वहावे व अस्थी एखाद्या डब्यातून किंवा मडक्यातून घरी आणाव्यात. त्या घराबाहेर कोठेतरी टांगून ठेवाव्यात व चितेची रक्षा गोळा करुन नदीत किंवा समुद्रात सोडावी.(अर्थात हे मुंबई शक्य होत नाही परंतु रक्षा गोळा करुन कुठल्यातरी चौपाटीवर नेऊन सोडावी) या विधीस सारी भरणे असे म्हणतात.

२) प्रचलित प्रथेप्रमाणे मृत्यु दिनाच्या सातव्या दिवसापासून क्रियाकर्माच्या विधींना सुरुवात करावी. परंतु अलिकडे वेळेच्या उपलब्धतेनुसार सर्व भाऊबंधास व पाहूणे मंडळीस सोईचे जावे म्हणून हे विधी दहाव्या दिवशीच करतात. या बाबतीत ब्राह्मणांच्या मार्गदर्शनानुसार विधी करुन घ्यावेत.

३) अकराव्या दिवशी सूतक संपते त्यावेळी शक्य असल्यास ब्राह्मणाकडून पाणी घ्यावे नाहीतर जवळच्या देवळात जाऊन तीर्थ आणावे. त्यात थोडे गोमूत्र मिसळावे व घराची शुध्दी करावी.

४) बारावे व तेरावे ही विधीही ब्राह्मणाकडून करुन घ्यावयाचे असतात. त्या दिवशी फक्त एक जेवणकरी ठेवावा आणि फक्त गाईस पान काढावे. कावळ्यास, अग्नीस, तुळशीस वाडी ठेवू नये. या दिवशीच्या जेवणाच्या पहिल्या पंक्तीस मृताच्या मुलांना किंवा ज्याने कोणी पिंडदान/अग्नी देण्याचा विधी केला असेल त्यांना बसवावयाचे असते. कारण क्रियाकर्म करणाऱ्या मुले किंवा व्यक्ती या तेरा दिवसांचे विधी करीत असता जेवावयास घरातील मंडळीपासून वेगळे व जमिनीवर (पाट न घेता) बसत असतात म्हणून तेराव्या दिवशी पहिल्या पंक्तीस बसवून त्यांना पंक्ती पावन करुन घेण्याची प्रथा आहे.

***टिप :***

1) ***क्षौरकर्म म्हणजेच केस काढण्याचा विधी :*** *क्षौर म्हणजे शेंडी ठेवून डोक्याचे केस व दाढी मिशी काढणे. मृत व्यक्तीच्या मुलग्यांनी क्षौर करावयाचे असते. मुलगा नसल्यास जी व्यक्ती क्रियाकर्म करीत असेल तिने क्षौर करणे आवश्यक असते. क्रियाकर्म करणारी व्यक्ती जर मृत व्यक्तीपेक्षा वयाने मोठी असेल तर तिने क्षौर करु नये, पण ती व्यक्ति मृत व्यक्तीपेक्षा लहान असेल तर तिने क्षौर करावे.*

2) *अविवाहीत प्रौढ मुलगा मृत झाल्यास त्याचा विवाह रुईच्या झाडाबरोबर लावला जातो. त्यावेळी चितेवर रुईची एक फांदी उभी करुन तिला हळदीने रंगवलेला कपडा गुंडाळून, अंतरपाट धरुन एक मंलाष्टका म्हणावी व उपस्थितांपैकी कुणी*

*तरी रुईला माळ घालावी. अविवाहीत मुलगी/प्रौढा मृत झाल्यास अशाप्रकारचा विधी केला जात नाही.*

३) *गरोदर स्त्री मृत झाल्यास तिला अग्नी न देता पुरण्याची प्रथा आहे.*

४) *दात न आलेल्या मुला/मुलीचे निधन झाल्यास त्यांना पुरले जाते.*

५) *दात आलेल्या मुला/मुलीचे निधन झाल्यास त्यांचे दहन केले जाते.*

६) *मृत मुलगा बारा वर्षापेक्षा मोठा असल्यासच त्याचे दिवसकार्य करावे.*

७) *वयात आलेल्या मुलीचे फक्त दसपिंडीपर्यंतच कार्य करावे.*

८) *मुलीचे सुतक घरच्यांना दहा दिवसांचे व भावकीला तीन दिवसांचे असते.*

९) *मुलगा नसल्यास पती, पत्नीचे अत्यंसस्कार/कार्य करु शकतो. त्याने क्षौर करु नये.*

***टीप :***

*पिंडदान केलेल्या व्यक्तीने/व्यक्तींनी तेराव्यापर्यंत जमिनीवर बसून जेवावे. त्यानी रात्रीच्या जेवणात भात घेऊ नये. तसेच केलेल्या डोक्यावर चंदन लावावे. तेल लावू नये.*

मृत व्यक्तीच्या आत्म्यास मोक्ष प्राप्तीसाठी तेराव्यानंतर केली जाणारी श्राध्दे.

**भरणी श्राध्द :** हे श्राध्द पितृपक्षात म्हणजे भाद्रपद कृष्ण पक्षात केले जाते. या बाबतीत ब्राह्मणास विचारुन घ्यावे. हे श्राध्द मृत्युनंतर येणाऱ्या पहिल्या पितृपक्षात करावयाचे असते. सर्वसाधारणत: भाद्रपद कृष्णपक्षाच्या प्रतिपदा किंवा द्वितीयेस पुरुषांचे भरणी श्राध्द येते त्यास ''**अनसुद म्हाळ**'' असे म्हणतात तर बायकांचे भरणी श्राध्द भाद्रपद वद्य तृतीय किंवा चतुर्थीस करतात त्यास ''**भरणी श्राध्द**'' असे म्हणतात. त्या दिवशी तीन जेवणकार व एक जोडे ठेवतात. (वयस्क नवरा बायको) स्त्री सवाष्ण गेली असेल तर तिच्या नावे एक सवाष्ण ठेवतात. बाकी, विधी हे ब्राह्मणकरवी करुन घ्यावेत. या श्राध्दाच्यावेळी फक्त पिंडांना एकच वाडी दाखवितात. त्या दिवशी कावळ्यास त्याचप्रमाणे अग्नी, तुळशीस वाडी दाखवावयाची नसते.

***टीप :***

*काही अपरिहार्य कारणांमुळे किंवा भावकीच्या सुतकाच्या दिवसातच भरणी श्राध्दाची तिथी असल्यास ते कार्य प्रथम वर्षश्राध्दाच्या दिवशी प्रथम करुन नंतर वर्षश्राध्दाचे विधी करावेत.*

**वर्ष श्राध्द :** हे श्राध्द ज्या मराठी महिन्याच्या तिथीस व्यक्तीचा मृत्यु झाला असेल त्या महिन्याच्या तिथीसच एक वर्षाने करतात. या दिवशी वडील आजोबा व पणजोबा यांच्या नावाने तीन जेवणकार ठेवावे लागतात. बाकी कार्य विधी ब्राह्मणास बोलावून करावेत. तद्नंतर येणाऱ्या पुढील वर्षातील श्राध्दाच्या दिवशी

इतर विधी करणे शक्य नसेल तर किमान कावळ्यास व गाईस वाडी द्यावी.

**तिथीस मिळविणे :** वर्ष श्राध्द झाल्यानंतर जर आजोबा जिवंत असतील तर तिथीस मिळविण्याचा विधी करता येत नाही. जर आजोबा जिवंत नसतील तर सर्वसाधारणपणे वडीलांचे श्राध्द करणाऱ्या व्यक्तीने आपल्या वडीलांच्या वर्षश्राध्दानंतर येणाऱ्या पहिल्या पितृपक्षात किंवा आपल्या सोईप्रमाणे त्यापुढील पितृपक्षात, श्राध्दकर्त्याच्या आजोबांची तिथी, की पितृ पक्षातील ज्या तिथीस त्याचे वडील हयात असताना त्यांच्या वडीलांच्या नावे ते जो विधी करीत तो न करता ती तिथी खंडीत करुन त्याच्या वडीलांच्या तिथीस (ज्या तिथिस वडील गेले असतील त्या दिवसाची मराठी महिन्याची तिथी) एकत्रिपणे आजोबांचेही श्राध्द करतात व त्या वडिलांच्या तिथीस स्वर्गीय आजोबांना आणून मिळवतात म्हणून या श्राध्दास तिथीस मिळविणे असे म्हणतात. ह्या श्राध्दास वडीलांचा पहिला महाळ किंवा महालय असे म्हणतात. या दिवशी पिंडदानाचा विधी असतो. तो ब्राह्मणाकडून करुन घ्यायचा असतो. तिथीस मिळविल्यानंतर पुढील वर्षापासून दरवर्षी वडीलांच्या नावे त्यांच्या मृत्युतिथीस पिंडदान करावे असा संकेत आहे. यासच महाळ घालणे म्हणतात. हे शक्य नसल्यास त्या दिवशी वडीलांच्या नावे जेवणकारी ठेवावत. तेही शक्य नसल्यास गाईस पान काढणे हे विधी तरी करावेत, की जेणेकरुन त्या दिवशी आपल्या दिवंगत पित्रांची आठवण केल्यासारखे होईल.

***टीप :***

१) *स्त्रियांना तिथीस मिळविले जात नाही. ज्या दिवशी वडिलांची तिथी असते त्याच दिवशी आईची तिथी संपन्न करावी.*

२) *तिथीस मिळविणे, महाळ(महालय) ही दोन्ही कार्ये सर्वसाधारणपणे सारख्याच पध्दतीने केली जातात. तिथीस मिळविताना किंवा महाळ घालताना पिंड हे खालील सुची क्र.''अ'' प्रमाणे काढतात. कारण ही कार्ये श्राध्द घालणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबापुरती किंवा घराण्यापुरतीच मर्यादित असतात म्हणजे या कार्यास वडील आजोबा, पणजोबा, त्याच्या आजोळ व सासरचे कुटुंब यांतील मृतव्यक्तीच्या नावेच पिंड काढायचे असतात.*

| सुची क्र.''अ'' | | |
|---|---|---|
| **श्राध्दकर्त्याने काढावयाचे पिंड** | | |
| वडीलांकडून | सासरवाडीकडून | आईच्या |
| वडील-आई | सासरे-सासू | माहेराकडून |
| आजोबा-आजी | | आजोबा-आजी |
| पणजोबा-पणजी | | पणजोबा-पणजी |
| सर्व मयत काका-काकी | | सर्व मयत मामा-मामी |
| पत्नी, बहीणी, भाऊ | | मावश्या |
| आत्या, पुत्र-मुली | | |
| निर्वशी | | |
| कुल पुरुष(घरवडी) | | |
| गुरु, प्रगुरु(गुरुंचा गुरु) (केलेले असतील तर) | | |
| गाव पुरुषांच्या नावे* | | |
| चुकल्या माकल्याच्या नावे एक | | |

***टीप :***

**गावपुरुष : हे त्या त्या गावच्या वकालांचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे गावच्या वकलानुरुप या पिंडाची संख्या बदलते. जसे एक वकाल असेल तर एक, दोन वकाले असतील तर दोन इत्यादी. (वकाल म्हणजे गावच्या मूळ पुरुषाच्या पुत्रांचा वंश विस्तार म्हणजेच प्रत्येक गावच्या ''वकालां'' ची संख्या ही मूळ पुरुषाच्या पुत्रांवर अवलंबून असते.)*

अशी वरीलप्रमाणे पितरांची यादी नावासहीत ब्राह्मणास द्यावी म्हणजे त्याप्रमाणे ते पिंड ठेवतील.

स्त्रिया सवाष्ण गेल्या असतील तर त्यांच्या नावापुढे सवाष्ण असे लिहावे म्हणजे ब्राह्मणांना त्याप्रमाणे पिंड काढतांना हळदकुंकू लावणे सोईचे होईल. **आपले स्वत:चे गोत्र, मामांचे गोत्र व सासऱ्यांचे गोत्र याची माहिती उपलब्ध करुन घ्यावी. कारण पिंडदानाच्या वेळी हे आवश्यक असते.**

प्रत्येक घराण्याचा मूळ पुरुष किंवा कुल पुरुष किंवा घरवडी याची माहिती

आपल्या जेष्ठांकडून उपलब्ध करुन घ्यावी.

**नगर महाळ (नगर महालय) :** नगर महाळ हे श्राध्द फारच व्यापक स्वरूपाचे असते. यासाठी श्राध्द कर्त्यास काढावे लागणारे पिंड हे वर उल्लेख केलेल्या सुची क्र.'अ' प्रमाणे ''तिथीस मिळविणे किंवा महाळादिवशी'' काढावे लागणारे सर्व पिंड अधिक आपल्या भाऊबंदांच्या घरातील इतर सर्व पित्रांचे (नवरा-बायकोसहीत) अगदी व्यापक स्वरूपात पिंडदानाचा विधी करावा लागतो.

प्रत्येकाने आपल्या वडीलांना तिथीस मिळविल्यावर दोन ते तीन वर्षातून एकदा महाळ व निदान पाच ते दहा वर्षानी एकदा तरी प्रत्येक घराण्यातील मंडळीनी नगर महाळ करावाच की जेणेकरुन आपल्या सर्व पित्रांची आठवण केल्याचे पुण्य पदरी पडेल.

तिथीस मिळविणे, महाळ व नगरमहाळ ही कार्ये ब्राह्मणांच्या हातूनच करुन घ्यावयाची असतात. त्यामुळे त्याची माहिती ही ब्राह्मणाकडून करुन घ्यावी.

**या दिवशी म्हणजे तिथीस मिळविणे, महाळ किंवा नगर म हाळाच्या दिवशी आपल्या पित्रांच्या नावे.**

अ) **जेवणकरी –** महाळासाठी तीन व नगर महाळासाठी कमीत कमी पाच किंवा जास्त, पण विषम संख्येत म्हणजे जसे पाच, सात, नऊ जेवणकरी बोलवावेत.

ब) **जोडी –** दोन (एक भाऊबंदापैकी व एक पाहूण्यांपैकी) बोलवावीत. नगर महाळासाठी पाच जोडी बोलवावीत. जोडी म्हणजे नवरा व बायको यांची जोडी.

क) **सवाष्ण/सुवासिनी–**एक बोलवावी. सुवासिनी नवरा जिवंत असलेली स्त्री.

ड) **आकवारीण –** एक (कुमार वयातील मुलगी) बोलवावी.

इ) **निमा –** एक (कुमार वयातील मुलगा) बोलवावा.

या श्राध्दाच्यावेळी ब्राह्मणाकरवी पिंडदानाचे कार्य झाल्यावर उपस्थित मंडळीनी पिंडाच्या पाया पडावे. सर्व मंडळींचे पाया पडून झाल्यावर हे सर्व पिंड एकत्र करुन **त्यांचे एक गाठोडे बांधून उंच ठिकाणी टांगून ठेवावे. जमिनीवर किंवा फरशीवर ठेवू नये.** नंतर आमंत्रित केलेले जेवणकारी, जोडी, सावष्णी वगैरे व पाहूणे मंडळी आल्यावर जेवणाचा कार्यक्रम सुरू करावा.

त्यावेळी करावयाचा एकंदर विधी पुढीलप्रमाणे असतो.

श्राध्दकर्त्याने आपल्या घराच्या प्रवेश दारात म्हणजे पडवीच्या दारात मुंबईत असेल तर घराच्या मुख्य दरवाजात दोन पाट ठेवावेत. एका पाटावर फुले व दुसरा पाट रिकामा ठेवावा व जवळच पाण्याने भरलेले भांडे ठेवावे. नंतर सर्व जेवणकर, जोडपी व इतर मानकरांना अभिवादन करुन बोलावून त्यांचे स्वागत श्राध्दकर्ता यजमान व त्याच्या सौभाग्यवतीने करावे. त्यासाठी सर्व प्रथम निमा याचे स्वागत करावे, नंतर जोडपी, त्यानंतर जेवणकरी, नंतर सवाष्ण. त्यानंतर आकवारीण यांचे स्वागत करावे. त्यावेळी प्रत्येक पुरुषाच्या पायावर यजमानाने व स्त्रीयांच्या पायांवर त्यांच्या सौभाग्यवतीने पाणी घालून व त्यांच्या हातात पाटावर ठेवलेली फुले द्यावीत. ती त्यांनी नंतर रिकाम्या पाटावर ठेवावीत व पुढे जेवणाच्या पंक्तीस बसण्यासाठी जावे. यावेळी सुध्दा जेवणाच्या पंक्तीस प्रथम निम्यास बसवावे व नंतर भाऊबंदकीतील जे जोडे बोलाविले असेल त्यांस बसवून नंतर इतर जोडपी, जेवणकरी, सवाष्ण, आकवारीण या क्रमाने त्यांना पुरुष व स्त्रियांच्या पंक्तीस बसवून त्यानंतर इतर पाहूणे मंडळीस पंक्तीस बसण्यासाठी आग्रह करावा. यावेळी पुरुषांची पंगत स्त्रियांची पंगत वेगवेगळी बसवावी.

त्यानंतर वरील पंगती बसल्या असतील त्या जागेच्या प्रवेश द्वाराजवळ जमिन सारवून घ्यावी(फरशी असेल तर ओल्या फडक्याने पुसून घ्यावी.) तिच्यावर छोटीशी रांगोळी काढावी किंवा कणे घालावेत.(कणे म्हणजे तांदळाच्या पिठाने विशिष्ट पध्दतीने काढावयाची पारंपारिक रांगोळी) नंतर तेथे गंध, अक्षता, फूले वाहून त्या जमिनीची पूजा करावी. नंतर पूर्वी पिंड बांधून ठेवलेले गाठोडे सोडून या रांगोळी काढलेल्या जमिनीवर ठेवावे. दूध व पाणी वेगवेगळ्या वाटीत/ग्लासात घ्यावे. यजमानाने पंक्तीकडे तोंड करुन हाताच्या ओंजळीत विडा(पान व सुपारी) घेऊन गुडघे टेकून बसावे व कोपरापर्यंत घट्ट हात जोडून ओंजळ वर करावी व कोपराची टोके पिंडांवर येतील असे करावे. नंतर यजमानीनने प्रथम दूध व नंतर पाणी यजमान्याच्या ओंजळीत ओतावे. यजमान्याने ते आपल्या दोन्ही हातांच्या मनगटामधील जागेतून कोपराने पिंडावर सोडावे. असे तिनदा करावे नंतर उजव्या मनगटास लागलेले दूध डाव्या मनगटाने व डाव्या मनगटाचे दूध उजव्या मनगटाने पुसावे. जमिनीवरील रांगोळी/कणे एकाच प्रयत्नात पुसून एकत्र करुन घ्यावेत. पिंडाचे गाठोडे पुन्हा बांधावे व पूर्वीच्याच जागी टांगून ठेवावे. त्यानंतर यजमानाने पुरूषास व यजमानीनने स्त्रीयांस आखीत लावावी(आखीत म्हणजे आधी गंध व

नंतर तांदूळ लावणे) आखीत लावताना सुध्दा प्रथम निम्यास नंतर भाऊबंदातील जोड्यास व नंतर इतरांना अशाप्रकारे क्रम असावा. त्यानंतर तयार केलेल्या सात वाड्या घरातील देवास, अग्नीस(चुलीकडे), तुळशीकडे, गाईस दाखवून घ्याव्यात व कावळ्यासाठी काढलेल्या तीन वाड्या या, वडील, आजोबा आणि पणजोबा यांच्या नावाने काढलेल्या असतात. त्या तीन वाड्या बाहेर घराच्या नळ्यावर/कौलांवर किंवा घराच्या गच्चीवर ठेवून त्यास पाणी सोडावे. नंतर यजमानाने पंगती जवळ यावे तेथे यजमानीने अक्षता टाकून पंगतीस नमस्कार करावा व त्यानंतर यजमानाने पंगतीस पाणी सोडून नमस्कार करुन मंडळीस भोजन करण्याची विनंती करावी.

***टीप :***

*देवाची व गाईची वाडी ही केळीच्या जिभेच्या पानावर काढावी व इतर पाच वाड्या या केळीच्या छोट्या पानावर काढाव्यात. वाड्या दाखवून झाल्यावर देवाकडची वाडी यजमानाने घ्यावी व तुळशीकडील वाडी घरातील इतर कोणीही घ्यावी.*

जेवण झाल्यावर यजमान्याने पुरूषाची व स्त्रियांची पाच पाच पाने उचलून ती टोपलीत भरुन गावाकडे असल्यास नदीत-वहाळात सोडून परत येतेवेळेस थोडी चार (ओले गवत) कापून सार्वजनिक वाटेवर टाकावी की जेणेकरुन गुरे ती खातील(मुंबईत हे विधी करणे व एवढे जेवणकरी मिळणे शक्य होत नाही म्हणून नगर महाळ हा शक्यतो गावाकडेच करावा.)

त्यानंतर शेवटी ओटीवर पुरुष जेवणकरांस निम्यासहित व आत वळयत (माजघरात) सवाष्णींना, आकवारणीसह एकत्र बसवावे. यजमानाने हातात दोन पानांचा वीडा(पाने व सुपारी) त्याच्या पानांची टोके जेवणकरांसमोर येतील असा धरावा व एका हातात तांदूळ घ्यावेत. नंतर प्रत्येक जेवणकरांसमोर जाऊन थोडे तांदूळ व वीड्याच्या जीभेकडील (टोकाकडील)थोडा भाग खुडून(तोडून)घेण्यास सांगावा. अशाप्रकारे सर्व पुरुष जेवणकारी व सवाष्णींना वीड्याच्या पानांचा तुकडा घेतल्यानंतर उरलेला वीडा हा निम्याच्या हातात द्यावा. नंतर सर्वांकडे दिलेले तांदूळ जमा करुन आपल्या घरातील तांदळाच्या भांड्यात टाकावेत. शेवटी सर्व जेवणकरांना मानपान व सवाष्णींची ओटी भरुन यजमान व यजमानीने निरोप देऊन चार पावले पोहचविण्यास जावे.

**शिळा महाळ :** नगर महाळच्या दुसऱ्या दिवशी शिळा महाळ करण्याची प्रथा आहे. त्या दिवशी फक्त एक जेवणकारी बोलवावा. ताजे जेवण करावे. जेवणकारास जेवावयास बसवून आखीत लावून त्याच्या हातावर पाणी घालून

त्यास नमस्कार करुन जेवण्याची विनंती करावी. या दिवशी वाड्या ठेवण्याची प्रथा नाही.

**जेवणकारी/जेवणकर ठेवणे :** प्रत्येक वर्षी महाळ घालणे हे वेळेच्याअभावी म्हणा किंवा कुटुंबातील इतरांच्या उपलब्धतेमुळे म्हणा शक्य होत नाही. अशावेळी पितृपक्षात आपल्या वडीलांच्या तिथी दिवशी वडील, आजोबा व पणजोबा यांच्या नावे तीन जेवणकरी व आई, आजी, पणजी सवाष्ण गेल्या असतील तर त्यांच्या नावे एक जोडपे ठेवावे. यावेळी पिंडदान करावयाचे नसते. जेवणकर व सवाष्णींची पंगत बसल्यावर वडील किंवा धाकट्या मुलाने पुरुष जेवणकरांस व त्यांच्या सौभाग्यवतीने सवाष्णींस आखीत लावून नमस्कार करुन, जेवण्याची विनंती करावी. त्यापूर्वी घरचा देव व गाय (या वाड्या केळींच्याच जीभेकडील पानावर काढाव्यात.), अग्नी(चूल), तुळस यांना वाड्या दाखवाव्यात व गावाकडे घराच्या छप्परावर किंवा मुंबईत गच्चीवर कावळ्यासाठी तीन वाड्या वडील, आजोबा व पणजोबांच्या नावे ठेवाव्यात. म्हणजे एकूण सात वाड्या कराव्यात.

***टीप :***

*१) देवापुढील वाडी यजमानाने व तुळशी पुढील वाडी घरातील इतर कोणीही घ्यावी अशी प्रथा आहे.*

*२) श्राध्द कर्म किंवा महाळ इत्यादी कार्यात वडील किंवा धाकट्या मुलास किंवा बंधूसच यजमान पदाचा अधिकार असतो. ते उपलब्ध नसल्यासच इतर मुलांस ही कार्ये करता येतात.*

**अविधवा नवमी :** पितृपक्षातील नवमीस सधवा मरण पावलेल्या स्त्रीच्या नावे जो विधी करतात त्यास अविधवा नवमी किंवा अयावनवमी असे म्हणतात.

या दिवशी जेवणकरी ठेवण्याची प्रथा नाही. त्या दिवशी सवाष्ण बोलावून तिला भोजन दिले जाते. श्राध्द करणाऱ्या यजमानाच्या यजमाननीने सवाष्ण जेवायला बसल्यावर तिला आखीत हळद्कुंकू लावावे. त्यानंतर घरचा देव, गाय, अग्नी, तुळस यांस प्रथेप्रमाणे वाड्या दाखवाव्यात व नळ्यावर कावळ्यास त्या स्त्रीच्या नावे एक वाडी ठेवावी व नंतर पाणी सोडून सवाष्णीस जेवायची विनंती करावी. जेवणानंतर तिची ओटी भरावी.

***टीप :***

*१) मुलगा नसल्यास पतीने अविधवा नवमीचे श्राध्द करावे.*

*२) सख्खी अथवा सावत्र आई किंवा दोन्ही जर अविधवा गेल्या असतील तर*

*त्याची अविधवा नवमी मुलाने किंवा असल्यास नवऱ्याने करण्याची प्रथा आहे.*

३) *नातवाने आजीचे अविधवा नवमी श्राध्द करणे आवश्यक नाही.*

**वाडी दाखविणे :** दिवंगत वडील, आजोबा, पणजोबा यांची आठवण म्हणून प्रत्येक सणादिवशी त्याना वाडी दाखविण्याची प्रथा आहे. या दिवशी घरात गोड जेवण करावे. वाडी दाखविणाऱ्या व्यक्तीने वाडी दाखवीपर्यंत उपवास करावा व प्रथेप्रमाणे घरातील देवास वाडी दाखवावी. गाईच्या नावे वाडी काढावी. त्याचप्रमाणे घरातील अग्नी, तुळस यांना वाड्या दाखवून तीन वाड्या वडील, आजोबा, पणजोबा यांच्या नावे गावाकडे घराच्या छपरावर किंवा मुंबईत गच्चीवर कावळ्यांसाठी ठेवाव्यात व त्यांस पाणी सोडावे व नंतर घरातील मंडळीनी जेवावे.

**अंगात संचारणे :** सर्व साधारणत: तेरावे व भरणी श्राध्द किंवा वर्षश्राध्दाच्या दिवशी रात्रौ भजनाचा कार्यक्रम असतो. त्या भजनात ज्या मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ ही कार्ये केली जातात, तिच्या जर काही सुप्त इच्छा मागे राहिल्या असतील तर त्याची जाणीव नातलगांस देण्यासाठी ती व्यक्ती कुटुंबातील कुणातरी व्यक्तीच्या अंगात संचारते व तिच्या तोंडून आपल्या राहीलेल्या इच्छा व्यक्त करते, असा समज आहे. जर अशा भजनात कोणाच्याही अंगात संचार झालाच तर त्या व्यक्तीस कोणी स्पर्श करायचा नसतो. झालेला संचार खरा आहे किंवा ढोंग आहे याचा पडताळा करण्यासाठी भजन जोरात सुरूच ठेवण्यात येते व त्या संचार झालेल्या व्यक्तीच्यासमोर पाट ठेवून उपस्थितांपैकी एखादी जाणती व्यक्ती, पुढाकार घेऊन पाटावर तांदळाच्या पाच मुठी निरनिराळ्या नावाने (आपल्या मनात ठरवून) ठेवते. सर्व साधारणत: पाच मुठींपैकी एक मूठ ग्राम दैवताच्या नावाने, दुसरी मूठ त्याच्या घरवड्याच्या म्हणजेच घराण्याच्या मूळ पुरुषाच्या नावे , तिसरी मूठ संचार झालेल्या व्यक्तीच्या नावे, चौथी मूठ घरातील इतर कोणाही मृत व्यक्तीच्या नावे व पाचवी मूठ निनावी ठेवते. त्याचा क्रम ती जाणती व्यक्ती स्वत:च्या मनात ठरविते व फक्त माहितीसाठी दुसऱ्या व्यक्तीच्या कानात सांगते की जेणेकरुन या संचारावरचा विश्वास वाढावा व त्यानंतर त्या संचारास त्याच्या नावे ठेवलेल्या तांदूळाच्या मुठीस स्पर्श करण्यास सांगण्यात येते. जर त्या संचाराने आपल्या नावाची मूठ ओळखली व या बाबतीत पुढाकार घेतलेल्या व्यक्तीचे व अर्थात ज्या व्यक्तिच्या कानात सांगितलेले असते त्या

व्यक्तीचे समाधान झाले तरच, संचार हा ज्या व्यक्तीचे श्राध्द किंवा कार्य असते तीच व्यक्ती आहे हे निश्चित होते. नंतर त्या संचाराचे म्हणणे ऐकावयास हरकत नसते. पण जर संचाराने भलत्याच तांदूळाच्या मूठीस स्पर्श केला की ते ढोंग आहे हे निश्चित होते. त्यामुळे त्याची दखल घेण्याची आवश्यकता नसते. संचाराचे खरेपण कळल्यावर त्यास घरातील सर्वांनी नमस्कार करुन त्याच्या पुढ्यात बसावे व त्यास बोलते करुन त्या मृत व्यक्तीस जे कांही सांगावयाचे आहे ते ऐकून घ्यावे व त्याप्रमाणे पुढे वागू असे सांगावे की जेणेकरुन त्या आत्म्याचे समाधान होऊन त्यास मुक्ती मिळेल.

***टीप :***

*एकदा संचाराच्या सत्यतेची खात्री पटली तर याबाबतीत मुळीच टाळाटाळ करु नये.*

**अशौच :–** अशौच दोन प्रकारची असतात.

(१) सोयर (सुयर) : बाळाचा जन्म झाल्यावर जे अशौच पाळले जाते त्यास 'सोयर(सुयेर) ' असे म्हणतात.

(२) सुतक : घरातील व्यक्तीचा देहान्त झाल्यावर जे अशौच पाळले जाते त्यास ' सुतक ' असे म्हणतात.

हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे हे अशौच १० दिवस पाळावे लागते. या कालावधीत घरात देवपुजा, मंदिरात जाऊन देवदर्शन, एकादे शुभकार्य करणे वर्ज्य असते. पुरुषांनी दहा दिवसानंतर अकराव्या दिवशी ब्राम्हणाकरवी तीर्थ व गोमूत्र यांचा शिडकावा करुन घराची, घरातील देव-देवतांची शुध्दी करुन, घरातील मंडळींनी आंघोळी करुन (स्त्रीयांनी केस धुवून नंतर आंघोळ करावी). नंतर ब्राह्मणाकडून मिळालेले तीर्थ प्राशन करुन स्वत:ची अशौचातून मुक्ती करवून घेऊन सर्वसाधारण प्रमाणे आपले दैविक विधी व इतर कार्यक्रम सुरु करावयाचे असतात.